
# रामलल्ला अयोध्येत विराजमान !

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २३ जानेवारी २०२४






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# निसर्गरम्य श्रीक्षेत्र बदामी



आधुनिक केसरी

मंदिराच्या आवारात एका खांबावर केलेल्या कोरीव कामात राष्ट्रकूट काळातील राजांची नावे कोरली आहेत. त्यावर कानडी भाषेत १०१९ या वर्षाचा उल्लेख असून त्या काळी युद्धात पराक्रम गाजवलेल्या राष्ट्रकूट घराण्यातील राजा भीमदेव याच्या सैनिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या स्तंभाची निर्मिती करण्यात आली. सकाळी या मंदिरातील देवीला जेव्हा स्नान, पंचोपचार आणि अभिषेक इ. नित्यपूजा केली जाते, तेव्हा आपल्याला अतिशय सुंदर अशा शाकंभरी मातेच्या सिंहारूढ भव्य मूर्तीचे दर्शन घडते. देवी अष्टभुजा असून मूर्ती सालंकृत आहे. देवीच्या उजव्या हातामध्ये खड्ग, डमरू आहे. गळ्यामध्ये हार असून अंगाखांद्यावर विविध अलंकार आहेत. मस्तकावर नावरत्नांचा मुकुट भगवतीने परिधान केला आहे. मुद्रा अत्यंत प्रसन्न आहे. गाभाऱ्यासमोर कासव आहे. शाकंभरी मातेची ही मूर्ती काळ्या पाषाणातून घडवली आहे. मूर्ती इतकी सुंदर आहे की त्यावरून नजर हटत नाही. या नित्यपूजेच्या वेळी मंत्रोच्चाराच्या गजरात पुजारी देवीला उष्णोदकाचे जे स्नान घालतात ते पाहण्यासारखे असते. त्यानंतर मूर्तीला चंदनाचा लेप लावला जातो. सर्व भाविकांनी भक्तिभावाने आणलेल्या साड्या देवीला अशा कौशल्याने पुजारी नेसवतात की आपण बघतच राहतो.

देवीच्या मंदिराभोवती विशाल असे आवार आहे. या आवारात उभ्या असलेल्या दोन भव्य दगडी दीपमाळा आपले लक्ष वेधून घेतात. मंदिराभोवती तटबंदी आहे. आतील बाजूला ओवऱ्या आहेत तसेच प्रदक्षिणा आणि पालखी सेवेसाठी मोकळी जागा आहे. प्रदक्षिणेच्या मार्गावर केदारेश्वर, हनुमान, सहदेव, श्रीचक्र ही मंदिरे आहेत. मंदिराच्या बाहेरच्या बाजूला भक्तांच्या निवासासाठी खोल्या बांधलेल्या आहेत.



## आनंदी पहाट

# बालपणातील मैत्री विकासाचा महत्त्वाचा पैलू

आधुनिक केसरी

बालपणात मैत्री हा विकासाचा एक महत्त्वाचा पैलू बनतो, जेव्हा सामाजिक खेळासाठी बराच वेळ दिला जातो आणि सामाजिक परस्परसंवाद कौशल्ये अधिक महत्त्वाची बनतात. शालेय वयातील मुले समवयस्कांशी संवाद साधण्यात बराच वेळ घालवतात आणि त्यामुळे त्यांना लहानपणापासूनच आत्मसात केलेली मैत्री कौशल्ये वाढवण्याच्या अनेक संधी उपलब्ध होत जातात. मुलांमध्ये अशा व्यक्तींशी मैत्री निर्माण करण्याची प्रवृत्ती असते, जी विविध आयामांमध्ये स्वतः सारखी असते. शालेय वयातील मुले आक्रमकतेमध्ये विशेषतः त्यांच्या मित्रांसारखीच असतात. या वयातील मुले त्यांच्या पालकांपासून वाढत्या स्वातंत्र्याचा विकास करत असल्याचे दिसून येते, त्यांचे मित्रांसोबतचे संबंध प्रीस्कूलमधील अनेक पालकांच्या सहभागावर काहीसे कमी अवलंबून असू शकतात. प्रौढ व्यक्तीच्या प्रत्यक्ष देखरेखीबाहेर मुले त्यांच्या मित्रांसोबत जास्त वेळ घालवू शकतात. बालपणातील सामाजिक आणि संज्ञानात्मक प्रगतीसह, मित्रासोबत वेळ घालवण्यामुळे सामायिक घनिष्ठतेच्या विकासास चालना मिळू शकते, जी वारंवार सामायिक रहस्ये बनते आणि या वयात मुलांसाठी मैत्रीचे एक निश्चित वैशिष्ट्य बनते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

शालेय वयातील मैत्री ही बालपणीच्या मैत्रीपासून अनेक अतिरिक्त मार्गांनी वेगळी असल्याचे दिसून येते. बालपणातील मैत्रीपेक्षा मध्यम बालपणातील मैत्री कालांतराने अधिक स्थिर असते, परंतु सामान्यतः किशोरवयीन किंवा प्रौढ मैत्रीपेक्षा कमी असते. याव्यतिरिक्त, मैत्रीचे नामांकन लवकर बालपणाच्या तुलनेत मध्यम बालपणात अधिक वारंवार केले जाते. सुरुवातीच्या बालपणाप्रमाणे, शालेय वयातील मैत्री ही सामाजिक संपर्क, बोलणे, समानता, सकारात्मक प्रभाव, परस्पर आवडी, जवळीक आणि निष्ठा यांद्वारे वैशिष्ट्यीकृत असते. भावनिक पारस्परिकता, भावनिक तीव्रता आणि भावनिक समंजसपणाचे प्रात्यक्षिक हे सर्व सामान्य असल्याचे दिसून येते. मध्यम बालपणातील मैत्री मोठ्या प्रमाणात सामायिक क्रियाकलापांद्वारे परिभाषित केली जाते, तरीही मध्यम बालपणात, सामायिक क्रियाकलापांच्या पलीकडे जाणे आणि कालांतराने सातत्य असणे ही मैत्रीची संकल्पना अधिक पूर्णपणे प्रकट होते.



आधुनिक केसरी

## अद्वैती चंदन | विटेवरी ||

चंदनाचा देव | चंदनी घरात ||
गंध संसारात | चंदनाचा ||१||
चंदनाचा भाव | चंदन चरणी ||
गोंदन चंदनी | देह झाला ||२||
शुद्ध चंदनाची | ब्रह्मरस उटी ||
चंदन दिवटी | प्रकाशली ||३||
चंदनी देहात | चंदनी गाभारा ||
चंदन सोयरा | श्वास झाला ||४||
चंदनी प्रारब्ध | संचित चंदन ||
अद्वैती चंदन | विटेवरी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

तेणें दुःख जालें भारीं ।दीर्घ स्वरें रुदन करी ।
मनीं आठवे सुंदरी ।गुणवंत ॥२९॥
तंव तिची वार्ता आली ।तुमची कांता भ्रष्टली ।
ऐकोनियां आंग घाली ।पृथ्वीवरी ॥३०॥
सव्य अपसव्य लोळे ।जळें पाझरती डोळे ।
आठवितां चित्त पोळे ।दुःखानळें ॥३१॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

त्रिगुण भूत थूलादि तनु,
पंचकोश योग माहिं ।
यह बन्धन तें कब छुटौं, कह मुमुक्षुता
ताहिं ।।१५१।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/१५१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : आत्म्याला जेव्हा आपल्या बंधनाचे ज्ञान होते तेव्हा त्यापासून सुटण्याची त्याला चिंता होते. प्रकृती तथा तिचे तीन गुण, स्थूलादि पंच प्राकृतिक शरीर आणि पंचकोश यात आत्मा आसक्त झाला आहे. हे सर्व त्याच्यासाठी बंधन आहे. यातून मी कधी सुटणार, हा भाव मुमुक्षुत्व म्हणून ओळखला जातो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सर्व प्रथम अयोध्येत रामराया आपल्या स्वगृही मोठ्या डौलाने विराजमान होत आहेत त्यामुळे समस्त भारत भर आनंद उत्साह संचारला आहे. प्रभु श्रीरामाच्या चरणीं नतमस्तक होऊन समासाच्या पुढच्या चरणाकडे वळते. कर्माच्या सिद्धांतानुसार वाट्याला आलेले सगळे कर्म आनंदाने करायचे.त्यात कोणत्याही प्रकारचा भेदाभेद करायचा नसतो. "भेदाभेद भ्रम अमंगळ" केलेल्या सत्कर्माची वाच्यता कुठे करायची नाही.सगळे काही आनंदाने, सात्विकतेने,व अत्यंत महत्त्वाचे म्हणजे सहजतेने जीवनातील आत्मज्ञान समजून घेऊन मी काहीचं केले नाही या विचाराने रहाणे यालाचं "ब्रम्हज्ञान"असे म्हणतात. करून काहीच न करावे,असून काहीच नसावे. सगळी कर्मे करून अकर्तेपणा,सगळे भोग भोगून अभोक्तेपणा सगळ्या मध्ये राहून अलिप्तपणा हे तर आपल्या हिंदू धर्माचे सार आहे. जीवन तत्वज्ञान आहे.

# नामाकरताच नाम घ्यावे

आधुनिक केसरी

नाम हे निसरड्यासारखे आहे. निसरड्यावर गवत वाढत नाही, आणि त्याच्यावर पाय पडला तर घसरतो, त्याप्रमाणे नाम आपल्यावर उपाधी ठरू देत नाही. त्याला कोणत्याही उपकरणाची गरज लागत नाही. रोगी-निरोगी, विद्वान्-अडाणी, श्रीमंत-गरीब, लहान-थोर, स्त्री-पुरुष, जात-गोत, यांपैकी कोणतीही गोष्ट असली तरी अडत नाही, नसली तरीही अडत नाही. नामाशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाला शक्ती, बळ, पैसा वगैरे कोणत्या तरी गोष्टीची मदत लागते. असे हे अत्यंत उपाधिरहित असलेले नाम आपणही अत्यंत उपाधिरहित होऊन घेतले तरच त्यात आपल्याला प्रेम येईल. आपण उपाधिरहित होणे म्हणजे नाम हे केवळ नामाकरिताच, स्वतःच्या कल्याणाकरिताच घेणे, जगातल्या दुसऱ्या कशाहीकरिता न घेणे. आपण जर ते सकाम बुद्धीने घेतले, तर इच्छित कार्यभागही साध्य होत नाही, आणि आपले कल्याणही साधत नाही. सकाम नाम घेणे हे किती वाईट आहे हे सांगणे फार कठीण आहे. असे पहा की, स्त्री ही



अत्यंत पवित्र आहे, कारण देव, संत यांसारख्या विभूतीही तिच्यापोटी जन्म घेतात; अशा स्त्रियांना पळवून नेऊन अनीतीने वागायला भाग पाडून त्यावर पैसे मिळविण्याचा धंदा काही लोक करतात, ही किती निंद्य गोष्ट आहे बरे ! पण सकाम नाम घेणे ही गोष्ट त्याच्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक निंद्य आहे. म्हणून नाम हे नामाकरिताच घ्यावे, त्याचा संबंध आपल्या इच्छा-अपेक्षांशी ठेवू नये. नामाकरिता नाम घेतल्याने मन आपोआप अंतर्मुख होऊन जाते. नामाच्या साहाय्याने मन अंतर्मुख केल्यावर आनंद सापडतो. आपल्या हृदयातच तो सापडतो. आपण तीन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. आचरण अगदी शुद्ध ठेवावे; दुसरी, नामाला कधीही सोडू नये; आणि तिसरी, माझा सांभाळ करणारा कुणीतरी - म्हणजे सद्गुरु - आहे ही जाणीव जागृत ठेवावी. प्रत्येक माणसाला कशाचीतरी विशेष आवड असते; त्या आवडीमध्ये राहावे आणि त्यात जबरीने नाम घ्यावे. आत्मज्ञान व्हावे म्हणून त्याच्या मागे लागले तर ते लवकर होत नाही, भगवंताकडे लक्ष लागले म्हणजे ते आपोआप होते. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. उत्तम वस्तू नेहमी थोडीच असते. श्रीखंडामध्ये चक्का आणि साखर कितीतरी असते, पण केशर किती थोडे घालावे लागते ! तसे भगवंताच्या नामाचे आहे. रोज थोडे पण अगदी मनापासून आणि मोबदल्याची अपेक्षा न करता नाम घ्यावे, ते फार काम करील. भगवंत हा सर्वसत्ताधीश खरा, पण एका बाबतीत तो लुळापांगळा होतो व सहज अडकतो. भुंगा जसा लाकूड पोखरतो पण कमळात अडकतो, तीच स्थिती नामाच्या बाबतीत भगवंताची होते. १६. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे, तसे नाम हे मनाचे जीवन आहे.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

आणि ह्याच्या मोबदला आम्हांस अमोल वस्त्रें-भूषणें दे; म्हणजे तीं सर्व मंडळीस देऊन रवाना करतां येईल. हें भाषण ऐकून कुबेरानें येथील धन येथेंच असूं द्या. आज्ञा कराल त्याप्रमाणें वस्त्रालंकार मी घेऊन येतों. मग त्यानें वस्त्रांचीं दिंडें व तऱ्हेतऱ्हेचे पुष्कळ अलंकार आणून दिले. तीं वस्त्रें भूषणें सर्वांना दिलीं; याचकांना द्रव्य देऊन त्या सर्वांच्या इच्छा तृप्त केल्या व मोठया सन्मानानें सर्वांची रवानगी करून दिली. समारंभ झाल्यावर उपरिक्ष वसूसमागमें मीननाथास सिंहलद्वीपास त्याच्या तिलोत्तमा मातोश्रीकडे पाठवून दिलें. त्यानें मीननाथास तिलोत्तमेच्या स्वाधीन केलें व मच्छिंद्रनाथाचा सारा वृत्तांत तिला सांगितला. तेव्हां मच्छिंद्रनाथाच्या भेटीची निराशा झाल्यामुळें तिच्या डोळ्यांस पाणी आले.

मंगळवार, २३ जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १५८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 23 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-158 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05



# भारताचा पुढील काळ उज्ज्वल

## पंतप्रधान मोदी : श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, देशात दिवाळीला उधाण !


आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या : आज देशात निराशेला अजिबात स्थान नाही. मी खूप लहान आहे, छोटा आहे, असा विचार जर कुणी करत असेल तर त्याने खारीच्या योगदानाची एकदा आठवण करावी. खारीने दिलेले योगदानच आपल्याला प्रेरणा देईल. व्यक्ती छोटा असो किंवा मोठा त्याच्या योगदानाचे महत्त्व वेगळे असते. भारताचा पुढील काळ उज्ज्वल असणार आहे. भारताची वेळ आता सुरू झाली आहे. शतकांच्या संघर्षानंतर आम्ही इथे पोहोचलो आहोत. आता आम्ही थांबणार नाही. विकासाच्या शिखरावर जाऊनच आपण थांबायचे आहे. राम मंदिर निर्माण झाले आहे, याबद्दल मी सर्वांना शुभेच्छा देतो, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.**

अयोध्यानगरीत सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यानंतर देशभरात दिवाळी साजरी करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित साधू, संतांशी, निमंत्रितांशी आणि देशाशी संवाद साधला. पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर तर बनले, आता पुढे काय? शतकांपासूनची प्रतिक्षा तर संपली, आता पुढे काय?, असा प्रश्न पंतप्रधान मोदींनी उपस्थित केला आणि पुढील हजार वर्ष भारतावर परिणाम टाकेल, असे कार्य आता करायचे आहे, असे सुतोवाच मोदी यांनी केले. आज या शुभप्रसंगी ज्या दैवी शक्ती आपल्याला आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित आहेत, आपल्याला पाहत आहेत. त्यांना आपण असाच निरोप द्यायचा का? आज मी पवित्र मनाने अनुभूती घेत आहे की, कालचक्र बदलत आहे. आमच्या पिढीला एका विशेष कामासाठी निवडले गेले आहे. हजार वर्षांनंतरची पिढी राष्ट्रनिर्माणाच्या आजच्या कामांचे स्मरण करेल. म्हणून मी सांगतो, हीच ती वेळ आहे, हीच योग्य वेळ आहे. आम्हाला आजपासून पुढच्या हजारो वर्षांच्या भारताचा पाया रचायचा आहे. मंदिर निर्माणाच्या पुढे जाऊन सर्व नागरिकांनी समर्थ, सक्षम, भव्य-दिव्य भारत निर्माणाची शपथ घेऊया. प्रभू श्रीरामाचे विचार जनमाणसात रुजवावेत, हीच राष्ट्रनिर्माणाची पायरी आहे. आपल्या चेतनाचा विस्तार करावा लागेल. देवापासून देशाकडे आणि रामापासून राष्ट्राकडे जाण्याचा प्रयत्न केला पाहीजे. हे करत असताना हनुमानाची निष्ठा, त्यांची सेवा, समर्पण हे गुण आपल्याला घ्यावे लागतील. प्रत्येक भारतीयामध्ये भक्ती, सेवा आणि समर्पणाचे भाव ही सक्षम भारताचा आधार बनतील, असेही मोदी म्हणाले.

## पंतप्रधान तपस्वी : मोहन भागवत

500 वर्षात अनेक पिढ्यांनी बलिदान देऊन



देऊन हा आनंदचा क्षण आपल्याला दिला आहे. अयोध्येत रामलला परत आले, पण ते बाहेर का गेले होते? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी प्राण प्रतिष्ठा सोहळ्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन केलं.

“आजचा आनंद शब्दात वर्णन करता येणार नाही. आज अयोध्येत रामललासोबत भारताच स्व परतलाय. सगळ्या देशात आज आनंदाच वातावरण आहे. छोट्या-छोट्या मंदिरांच्यासमोर दूरदर्शनवर हा कार्यक्रम सुरु आहे. सर्वत्र भावनिकता आहे, सर्वत्र आनंद आणि उत्साह आहे, असे सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले. राम मंदिर प्राण प्रतिष्ठा सोहळ्यानंतर ते बोलत होते. पंतप्रधान मोदींनी कठोर व्रत ठेवलं, सांगितले होते, त्यापेक्षा कठोर व्रत त्यांनी ठेवलं. मी मोदींना पूर्वीपासून ओळखतो, ते तपस्वी आहेत. आता आपल्यालाही काही गोष्टी आचरणात आणायच्या आहेत, असे मोहन भागवत म्हणाले. अयोध्येत रामलला परत आले, पण ते बाहेर का गेले होते? अयोध्येत कलह झाला म्हणून ते बाहेर गेले. 14 वर्ष वनवासात राहिले. ते जगाच भांडण मिटवून परत आले. आज रामलला 500 वर्षानंतर परत आलेत. त्यांच्या तपश्चर्येमुळे आपण आज हा सोनियाचा दिवस पाहतोय. त्यांची तपस्या, त्यागाला कोटी-कोटी नमन, असे मोहन भागवत म्हणाले.

‘आता आपल्यालाही तप करावा लागणार आहे’

आपल्याला कर्तव्य पार पाडायच आहे. पंतप्रधानांनी तप केला, आता आपल्यालाही तप करावा लागणार आहे. आपल्याला आपसातील भांडण मिटवावी लागतील. परस्परातील मतभेद, वाद, भांडण सोडून द्याव लागेल. रामराज्यात नागरिक ज्या प्रमाणेच आचरण करायचे, तस आचरण आपण केलं पाहिजे, समन्वयाने काम कराव लागेल. सेवा परोपकार भावना महत्त्वाच्या आहेत. सरकारच्या योजनांनी गरीबांना दिलासा मिळतोच आहे. पण जिथे दु:ख, पीडा आहे, तिथे आपण मदतीला गेल पाहिजे, असे मोहन भागवत म्हणाले. पवित्रतेसाठी संयम हवा, आपल्याला स्वत:च्या इच्छा, लोभ यापासून लांब राहिले पाहिजे. संयम ठेवून शिस्त पाळली पाहिजे. समाजात, सामाजिक जीवनात शिस्त पाळली पाहिजे. 500 वर्षात अनेक पिढ्यांनी बलिदान देऊन देऊन हा आनंदचा क्षण आपल्याला दिला आहे असं भागवत म्हणाले. मी विचार करतोय, मला इथे बसवले, मी काय केलं हा प्रश्न मला पडतो. त्यांच्या कार्याचा प्रतिनिधी म्हणून मी इथे बसलोय. त्यांच हे व्रत आपल्याला पुढे घेऊन जायच आहे, असे मोहन भागवत म्हणाले.

## हा स्वप्नपूर्तीचा दिवस

राम मंदिराचं उद्घाटन होताच योगी आदित्यनाथ यांच्याकडून आनंद



व्यक्त, म्हणाले अयोध्येतील राम मंदिराचं उद्घाटन झालं. या सोहळ्यात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी भाषण केलं. यावेळी त्यांनी प्रभू श्रीराम यांना वंदन केलं. योगी आदित्यनाथ यांचं पूर्ण भाषण... अयोध्येतील राम मंदिराचं उद्घाटन झालं. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उपस्थितांना संबोधित केलं. आप सभी को कोटीकोटी बधाई, असं म्हणत योगी आदित्यनाथ यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. जगातील भारत हा केवळ एक असा देश आहे. जिथे देशातील बहुसंख्य असलेल्या समाजाने आपल्या आराध्य असलेल्या प्रभू राम यांच्या जन्मस्थानी मंदिर बनवण्यासाठी लढा दिला. तोही वेगवेगळ्या स्तरावर संत, संन्यासी, पुजारी, राजकीय नेते, सामान्य लोकांनी यासाठी लढा दिला. शेवटी अखेर कोटी-कोटींची आस्था असलेल्या राम मंदिराचं उद्घाटन झालं, असं योगी आदित्यनाथ म्हणाले. आपल्या सगळ्यांच्या त्यागाला आणि लढ्याला पूर्णता प्राप्त झाली आहे. आज आत्मा प्रफुल्लित आहे. कारण जिथं मंदिर बनवण्याची घोषणा होती. तिथेच मंदिर बनलं आहे. आज मन भावूक आहे. बोलण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. संकल्प आणि साधनेच्या सिद्धीसाठी, संकल्पाच्या पूर्णतेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनापासून आभार, असं योगी आदित्यनाथ म्हणालेत.

2014 ला तुम्ही पंतप्रधान झालात तेव्हापासूनच जनतेला हे मंदिर होणार असा विश्वास होता. आता असं वाटतंय की, आपण त्रेतायुगात आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या मनात राम आहे. भारतातील प्रत्येक शहर आज अयोध्या झालं आहे. प्रत्येक शहराचा रस्ता आज अयोध्येकडे येतोय. त्या शिल्पकाराचे आभार ज्यांनी आमच्या मनातील रामाची मूर्ती तयार केली, असंही योगी म्हणाले.

## उत्साह, जल्लोष अन् फटाक्यांची आतषबाजी

**शांताराम मगर**

**वैजापूर :** आयोध्येत रामलल्लांची मूर्ती स्थापन होताच देशभरात उत्साहाचे वातावरण संचारले. जणू देशात दिवाळी साजरी करण्यात आली. ठिकठिकाणी फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला. मराठवाड्याचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या वैजापूर तालुक्यातील तलवाडा येथे टाळ - मृदुगांचा जयघोष करत वारकऱ्यांच्या वेशभूषा परिधान केलेले बालक, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन जय श्रीराम भजनात तल्लीन झालेल्या महिला - पुरुष मंत्रमुग्ध करणाऱ्या वातावरणात करण्यात आलेला जयघोष हे सर्व डोळ्याचे पारणे फेडणारे चित्र होते. यावेळी रामलल्लाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आबाल वृद्ध सहभागी झाले होते. हनुमान मंदीरापासून या शोभयात्रेचा प्रारंभ करण्यात आला. दरम्यान तलवाडा येथील ग्रामस्थांनी घरोघरी गुढी उभारल्या होत्या. डोक्यावर कलश तुळशी वृंदावन घेऊन महिलांवर्ग देखील भक्तीनामात तल्लीन झाल्या होत्या तर स्थानिक लोकप्रतिनिधीनीही फुगडीवर ठेका धरला. युवक वर्गाने टाळ मृदुगांच्या बोलावर ताल धरत या मिरवणुकीत रंगत आणली. यावेळी तुपे महाराज, पुरुषोत्तम महाराज, भागिनाथ मगर, राजेंद्र मगर, दादाभाऊ मगर, भाऊसाहेब मगर, हरिभाऊ मगर, मनोहर मगर, रामदास मगर, दादाभाऊ बोडखे, किशोर मगर, रवि मगर वसंत मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व गावकऱ्यांना महाप्रसाद म्हणून पुरणपोळी, सार, भजे, केशरदुध देण्यात आले.



## नार्वेकरांना नोटीस

आधुनिक केसरी

जवळपास दोन आठवड्यांपूर्वी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी निकाल दिला. यामध्ये त्यांनी दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवलं. तसेच, शिंदे गटाचे व्हिप भरत गोगावले यांनाच वैध ठरवत त्यांच्याविरोधातील याचिका फेटाळल्या. यानंतर ठाकरे गटानं थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. यावर आता सर्वोच्च न्यायालयाने आता राहुल नार्वेकरांच्या नावे नोटीस बजावली आहे. या नोटिशीवर उत्तर देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नार्वेकरांना दोन आठवड्यांचा कालावधी दिला आहे. ठाकरे गटाच्या बाजूने ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल युक्तिवाद करत आहेत. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पार्दिवाला व न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर ही याचिका सुनावणीसाठी आली. यावेळी कपिल सिब्बल यांनी न्यायालयासमोर याचिकेचा उल्लेख केल्यानंतर न्यायालयाने खटला थेट सर्वोच्च न्यायालयात न चालवण्याऐवजी उच्च न्यायालयात चालवला जायला हवा का? अशी विचारणा केली. मात्र, त्यावर कपिल सिब्बल यांनी खटला सर्वोच्च न्यायालयात चालवण्याचीच विनंती केली. या प्रकरणाचा निकाल देताना विधानसभा अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अवमान केला आहे. त्यामुळे या याचिकेवर इथेच सुनावणी व्हावी", अशी भूमिका कपिल सिब्बल यांनी मांडली. अखेर न्यायालयाने राहुल नार्वेकरांच्या नावे नोटीस बजावली आसून त्यावर येत्या दोन आठवड्यांमध्ये उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. राहुल नार्वेकरांनी निकाल देताना भरत गोगावले यांची शिंदे गटानं शिवसेनेचे मुख्य व्हिप म्हणून केलेली नियुक्ती वैध ठरवली. त्यामुळे सुनील प्रभू यांनी उद्धव ठाकरेंन नियुक्त केलेले प्रतोद म्हणून बजावलेला व्हिप नार्वेकरांनी अवैध ठरवला. तसेच, भरत गोगावले यांनी बजावलेला व्हिपदेखील तांत्रिकदृष्ट्या अपूर्ण असल्याचं नमूद करत त्यांनी ठाकरे गटाच्या आमदारांनाही अपात्र ठरवण्यास नकार दिला.

## भारतीय संस्कृतीचे दर्शन : अयोध्येचे श्रीराम मंदिर




प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड


आधुनिक केसरी

**परकीय सत्ताने आपल्या देशावर अनेक आक्रमण केले, त्यात हिंदू धर्मांची मंदिरे उध्वस्त झाल्यामुळे हिंदू धर्मीयांची मानसिकता ढासळली. परंतु आता यातून आपण सावरलो. आणि देशाबद्दलची राष्ट्रीय अस्मिता अयोध्येच्या राम मंदिरातून पुढे आली . त्यामुळेच आज श्रीरामाच्या पाऊल खुणा विश्ववात पसरलेल्या आहेत. भारतीय समाजाने हा प्रदीर्घकाळ लढा दिला.अनेक कार सेविकांना बलिदान द्यावे लागले, त्यांचे स्मरण ठेवून व सत्याची कास धरून हे मंदिर अयोध्येत साकारलेच? हा विश्व मांगल्याचा ठेवा असणारे सांस्कृतिक केंद्र आहे.**

या मंदिरात फक्त पूजा पाठच होणार नाहीत तर भारतीय संस्कृतीचे दर्शन होणार आहे, सांस्कृतिक मूल्यांची देवाणघेवाण होणार आहे; या मंदिरातून संपूर्ण विश्वाला वंदनीय असणारे श्रीराम यांचा आदर्श जपला जाणार आहे या मंदिरातून करोडो भाविकांचे दर्शन होणार आहे. या ठिकाणी आलेला प्रत्येक भाविक-भक्त, सदाचाराने वागणारा व ज्ञानवंत, गुणवंत, धर्मशील, सत्य बोलणारा सर्वांना सोबत घेऊन चालणारा, असेल त्याच्या मनातील वाईट विचार निघून जातील, अयोध्या, मथुरा, काशी ,हरिद्वार, कांची द्वारका या सर्व मंगलमय देवभूमी पेक्षा जास्त महत्व अयोध्येला असेल, कारण श्रीराम हा एकवचनी ,एक पत्नी, एक बानी असलेला भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा अयोध्येत आहे. काल प्राणप्रतिष्ठा झाली आणि आज भाविक दर्शन घेण्यास तयार झाले या मंदिरा तून राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होत आहे, सर्वसामान्यांच्या आकांक्षाची पूर्तता होणार आहे. अयोध्या नगरीमध्ये येणारा भावीक त्यांचे हेवेदावे ,वाईट वर्तन, व्यसन,सर्व विसरून श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी येईल, लोकसंस्कृतीत रुजलेला श्रीराम प्रत्येकाला हवा आहे, वास्तविकता श्रीरामाचे चरित्र तपोभूमी, वनवास या गोष्टी आपणाला स्फूर्ती देणाऱ्या आहेत. खरोखरच आता रामराजे येईल सर्वांना समानता मिळेल, सगळेजण आपण एक आहोत हे आता कोणी सांगायची गरज राहिली नाही, सन 1992 मध्ये घडलेला इतिहास अनेक जनांना माहित आहे परंतु तो आता समाप्त झाला ,लोकांचा बुद्धिभेद नाहीसा झाला, आणि सत्य हे तेजस्वी असते हे पुन्हा आपल्याला अनुभवण्यास मिळाले म्हणून 70 एकर जागेमध्ये असणारे हे श्रीराम मंदिर त्यांच्याबरोबर अनेक ऋषींचे मंदिर ,जटायु मंदिर ,शबरी मंदीर रामभक्त हनुमान मंदिर येथे बाजूला साकारणार आहेत,कैकेयी मातेचा शब्द प्रमाण मानून 14 वर्षे वनवास केलेला श्रीराम प्रत्यक्ष येथे साकारला आहे ,सर्व अटी त्यांनी मान्य केल्या, कंदमुळे खाल्ली, वल्कले नेसले त्यामुळे हा विश्वाचा स्फूर्तीदाता व मार्गदर्शक आहे ,चैत्र महिन्यातील शुक्लपक्षातील नवमीला रामनवमी साजरी केली जाते, याच दिवशी दुपारी बारा वाजता श्रीरामाचा जन्म त्रेतायुगात झाला. आणि आज 500 वर्षानंतर अयोध्यात 22 जानेवारी 2024 रोजी बारा वाजून वीस मिनिटांनी श्रीरामाच्या मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली ,करोडो लोकांनी श्वास रोखून धरला होता तो काल सोडण्यात आला, देशाच्या लाखो मंदिरामध्ये संत, महंत ,भाविक ,भक्त, महाराज, बुवा ,टाळकरी ,विणेकरी, मृदुंगाचार्य या सर्वांनी आपले लक्ष अयोध्येच्या श्रीरामाकडे ठेवले होते, ती वेळ कधी येईल कधी प्राणप्रतिष्ठा होईल असे सर्वांना झाले होते ,अनेक दिवसांपासून चालत आलेले होमहवन, यज्ञ,भजन,कीर्तन ,हे सर्व श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेची वाट पाहत होते आणि हा भूतलावरला स्वर्ग याच देही याच याच डोळा कोट्यावधी लोकांनी अनुभवला आणि धन्य झालो म्हणून लोकांनी जय श्रीराम म्हणून आनंद व्यक्त केला, त्यांच्याविषयी आपण माहिती करून घेणार आहोत... श्रीराम ज्याचे नाव आहे. आयोध्या त्यांचे धाम आहे. एक वचनी, एक पत्नी, एक बाणी मर्यादा पुरुषोत्तम,अशा रघुनंदनाला माझा प्रणाम आहे, श्रीरामाची प्रत्येक वृत्ती आणि व्यवहार धर्मशास्त्राप्रमाणे चाललेला आहे, श्रीरामाना जीवन जगताना अनेक समस्या आल्या, परंतु त्यांनी कधी आपला समतोल ढळू दिला नाही, यज्ञामध्ये अडथळे आणणाऱ्या अनेक राक्षसांचा त्यांनी समाचार घेतला, चांगले विचार, चांगल्या भावना आणि चांगले आचरण हीच माणसाची खरी संपत्ती आहे हे आपणाला श्रीरामांकडून शिकवण मिळते ,जोपर्यंत या जगात पवित्र भावना आहेत, निरामय नाती आहेत. निःस्वार्थ प्रीती आहे, तोपर्यंत श्रीराम जिवंत आहेत. ते सर्वांसोबत राहिले, मनात कधीही वाईट विचार येऊ दिला नाही, शापित अहिल्याचा त्यांनी उद्धार केला, आपली भक्त असणारी शबरीची उष्टी बोरं त्यांनी खाल्ले,बंधू लक्ष्मणाला सांगून शूर्पणखेचे नाक कापले आणि तिचा कुटील डाव त्यांनी हाणून पाडला होता, जटायू पक्ष्या विषयी त्यांना अतिशय सहानुभूती होती. त्यामुळे त्याचा त्यांनी रीतसर अंत्यविधी केला. शत्रू पक्षाकडून शरण आलेल्या लोकांना उदार अंतःकरणाने माफ केले, म्हणूनच श्रीराम हे भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ मानले गेले आहेत. प्रत्येकाच्या अंतःकरणात श्रीरामाचे नाव कोरलेले आहे. श्रीराम हा एक विचार आहे, ती एक संस्कृती आहे, भारतीय जनतेत श्रीराम जय राम जय जय राम ही हृदयातून येणारी घोषणा आहे. कुठेही दोन व्यक्ती एकमेकांना भेटल्यानंतर राम राम म्हणतात आणि नंतर पुढे ते बोलतात. कोणतीही गोष्ट करताना रामभरोसे म्हणून मनुष्य करत असतात. कारण श्रीराम हा सर्वाचा स्फूर्तीदायक प्रेरणास्त्रोत आहे. प्रत्येकाला त्यांच्याविषयी आपुलकी, माया ,प्रेम, दया, जिव्हाळा आहे रामायण माहिती नाही असा एकही व्यक्ती तुम्हाला या पृथ्वीतलावर शोधून सुद्धा सापडणार नाही ,कारण तो मर्यादा पुरुषोत्तम आहे. एखाद्या भागात चांगला राजा आहे. तिथे सर्वांना गुण्यागोविंदाने वागवले जाते. कोणावरही अन्याय केला जात नाही. त्याला रामराज्य असे म्हणतात. कोणीही कधीही उपाशी राहिले नाहीत.अन्याय ,अत्याचार त्यांच्यावर कधी झाला नाही. सामाजिक, कौटुंबिक,नैतिक,बौद्धिक, राजकीय या सर्व क्षेत्रात मर्यादित राहून हा पुरुष उत्तम कसा होऊ शकतो याची प्रचिती आपल्याला रामाच्या जीवना मुळे येते ,विचार आणि व्यवहारी कार्यात त्यांनी कधीही मर्यादा सोडली नाही. म्हणूनच त्यांना मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम म्हणतात. आदर्श पिता म्हणून राजाकडे पाहिले जाते. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा

.श्रीराम हा कुटुंबाचा आदर्श आहे. रामाला चार भाऊ होते. कधीही त्यांच्यात वादविवाद झाले नाहीत. वडिलांची आज्ञा पाळून ते 14 वर्षे वनवासाला गेले .कैकयी मातेमुळे आपणाला ही वेळ आली असे त्यांना कधीही वाटले नाही, परत ते कैकयी मातेला आदर पूर्वक नमस्कार करताना दिसतात, श्रीराम भगवान विष्णूचा सातवा अवतार होते, ते अयोध्या नगरीचे सूर्यवंशी महाराजा दशरथ आणि त्यांची जेष्ठ महाराणी कौशल्या यांचे पुत्र होते. परंतु आज प्रत्येक स्त्री श्रीरामासारखा पती मिळावा म्हणून प्रार्थना करते .श्रीरामाचे सीतेवर अमर्याद प्रेम होते. सीतेला हा पती जन्मोजन्मी मिळावा असे वाटत होते. आज प्रत्येकाला आपली जन्मभूमी प्रिय आहे, तसेच श्रीरामाला सुद्धा आपली जन्मभूमी अतिशय प्रिय होती. श्रीरामाला कोणत्याही गोष्टीचा मोह नव्हता, रावणाचा वध केल्यानंतर त्यांचे राज्य बिभीषणाला देऊन टाकले आणि वालीचा वध केल्या नंतर त्याचे राज्य सुग्रीवाला देऊन टाकले. असा निर्मळ मनाचा मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम होते. ते 14 वर्षे ज्या जंगलामध्ये राम -सीता लक्ष्मण राहिले होते त्यांचे नाव दंडकारण्य असे होते. सीता स्वयंवरात जे धनुष्य वापरले त्याचे नाव पिनाक होते. लंकेवर चाल करण्यापूर्वी श्रीरामाने रामेश्वरम येथे शिवलिंग बनवून शिवाची पूजा केली त्यालाच आज रामेश्वरम् असे म्हणतात.भगवान विष्णूच्या एक हजार नावांपैकी 394 वे नाव श्रीराम होते.श्रीराम नेहमी जे धनुष्य वापरत होते त्याचे नाव कोदंड होते. श्रीरामाने सेतू बांधला, श्रीरामचरित्रमानस या ग्रंथानुसार श्रीराम व रावणाचे 32 दिवस युद्ध चालले तर त्यांच्या सैनिकांमध्ये 87 दिवस हे युद्ध चालू होते, श्रीरामाकडून बंधुप्रेम आपण सर्वांनी शिकावं, 14 वर्षे ते वनवासाला असताना सुद्धा त्यांच्या भावाने त्यांच्या पादुका गादीवर ठेवून पूज्य भावाने सेवा केली .परंतु ते त्यांच्या राजगादीवर बसले नाहीत हा भावाच्या मनाचा मोठेपणा आहे, हीच गोष्ट सध्याच्या काळात कशी घडेल याचा ज्यांनी त्यांनी विचार करावा. प्रपंच करते वेळेस श्रीरामाचा आदर्श समोर ठेवून केल्यास कोणत्याच अडचणी येणार नाहीत. ज्याचे त्याला द्यावे. कोणावर अन्याय करू नये. कोणाचे हिसकावून घेऊ नये ही शिकवण श्रीरामा कडून आपल्या सर्वांना मिळते, श्रीरामाने संपूर्ण मानव जातीला प्रेरणा दिली, सत्य बोला, सत्तेच्या मार्गाने चला,आज बेरोजगारी ,दहशतवाद वाढत आहे एकमेकावरील विश्वास कमी होत आहे ,त्यामुळे यापुढे सर्वांनी नीती मार्गाने चालावे ,एकमेकांशी आपले पणा ठेवावा, भावा -भावामधील प्रेम सदैव असावे दृष्ट लोकांना जवळ करू नये, प्राणीमात्रावर दया करावी, संस्कृतीनुसार वागावे तेव्हा श्रीरामाचा आदर्श आपल्यापुढे आहे असे आपल्या सर्वांना वाटेल आणि त्या मंदिराचे पावित्र्य टिकून राहील ,त्यावेळेस तुम्हाला काही कमी पडणार नाही, भारतात सर्वत्र अतिशय आनंदाने हा सोहळा साजरा केला. अयोध्येत श्री रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली, संपूर्ण देशभर भगवे झेंडे ,फटाक्यांची विक्री, प्रत्येक श्रीराम मंदिरात विद्युत रोषणाई ,स्वच्छता, घरोघरी दिवे लावून मंदिरात महाआरती करून हा आनंदोत्सव दीपवालीच्या सणाप्रमाणे साजरा झाला, सामूहिक श्रीरामाचा जप करण्यात आला, इतिहासात तेच लोक स्मृतीमध्ये राहतात जे सत्य वागतात सर्वांना सोबत घेऊन चालतात त्यांचीच पुढील काळात संस्कृती तयार होते, आणि हीच संस्कृती चिरःकाल टिकते स्वर्गातून कोणी उतरले नाही येथेच मानवाने चांगले कर्म केले आणि देव झाले असे आपणाला म्हणता येते जान जाये मगर वचन ना जाये असे म्हटले जाते सुवर्णमय असणाऱ्या लंकेचा मोह त्यागून त्यांनी आपली जननी व जन्मभूमी यांचा गौरव केला हे सर्वांनी लक्षात ठेवावे, आजच्या भारताचे सांस्कृतिक आणि भौगोलिक एकात्मता श्रीराम यांच्या वनवासाचे फलितच आहे, अयोध्येतील राम मंदिरात झालेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी संपूर्ण देश सज्ज झाला आहे या क्षणाचा साक्षीदार मला होता आले याचे समाधान घराघरातील प्रत्येक व्यक्ती मध्ये दिसत आहे. हे मंदिर बांधण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी हा लढा चालू ठेवला, त्यांना प्रणाम करतो ,यापुढे समाजातील कटूता संपावी ,संपूर्ण देश राममय व्हावा आणि खरोखरचं रामराज्य नांदावे एवढीच अपेक्षा..

## नेत्रदीपक सोहळा सांस्कृतिक परिवर्तनाचा दिन




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301


आधुनिक केसरी

**आजचा ऐतिहासिक नेत्रदीपक सोहळा डोळयाच पारणं फेडणारा असून राष्ट्र भक्ति जागृत करणारा ऐतिहासिक क्षण आहे.जो उत्साहात उत्सव स्वरूपात साजरा होत आहे.नैमिष अरण्यात महाराज मनु व दैवी सतरूपा यांनी केलेलं कठोर तप फळास आलं.आणि निर्गुण निराकार ब्रह्म सगुण स्वरूपात सृष्टीवर अवतारीत झाल.महाराज मनू यांच्या तपश्चर्याचा आदर म्हणून प्रभु सृष्टीवर आवतारीत झाले ते आदर्श स्थापित करण्यासाठी मानवी जीवन कसं असलं पाहिजे याची मर्यादा निर्धारित करण्यासाठी.आज राम नामाच्या जयघोषाने देश दुमदुमला आहे हा निनाद जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचला आहे.प्रभु श्रीराम यांच नाम हा उर्जास्रोत आहे याचा अनुभव अनुभुती आज आपण सगळे घेत आहोत.याच डोळा याच देही सर्वांनी अनुभवला आहे.**

दिवाळी पेक्षा ही आनंदी वातावरण आज देशात निर्माण झाल आहे हि सामाजिक संस्कृतीक बदलाची हवा भविष्यातील परिवर्तनाची नांदी ठरेल. अयोध्या येथे आज होत असलेला प्रभु श्रीराम यांच्या मंदिर जीर्णोद्धार प्राण प्रतिष्ठापना दिनाच चैतन्य जगातीक पातळीवर एक वेगळी उर्जा निर्माण करणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात ज्या पद्धतीने एक सकारात्मक उर्जा संचारली आहे हा निश्चितच देशाच्या वैभवात भर घालणार आणि संस्कृतीक इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहण्या सारखा गौरवशाली क्षण असून हे चैतन्य आणि उर्जा टिकवून ठेवण्याचं मोठं आव्हान स्वीकारून हा उत्सव आपण साजरा करतोय हा आनंद गगनात मावणारा नसून आजचा दिन सामाजिक संस्कृती दिन म्हणून नक्कीच इतिहासात अजर अमर राहिल.जगातीक पातळीवर भारत देश हा सामाजिक संस्कृती ची राजधानी असून आजचा ऐतिहासिक उत्सव पुन्हा एकदा याच बाबीवर शिक्कामोर्तब करत आहे.आज देशात एक नवं पर्व नवा अध्याय आंरभ झाला आहे.लहान थोर सगळ्यांच्या मनात एक वेगळी उर्जा संचारली निर्माण झाली आहे. हा संस्कृती परिवर्तनाचा इतिहास ऐतिहासिक असून येणाऱ्या भविष्यातील पिढी साठी हा क्रांतीकारी परीवर्तनाचा क्षण आहे. प्रभु श्रीराम हे जगाचे दैवत असून चरित्र निर्माणाचे प्रतिक आहेत. जगभरातील देशांना प्रभु श्रीराम खुप अगोदर समजले.त्यां त्या देशातील विचारवंत यांनी प्रभु श्रीराम यांच जीवन चरित्र त्यांच्या भाषेत साहित्य स्वरूपात निर्माण केला त्याचा तेथील लोकांनी योग्य विनियोग केला आणि आपला जीवन स्तर सुधारण्यासाठी आणि लोकांना योग्य मार्गावर येण्यासाठी अनेक वेगवेगळ्या देशांनी प्रभु श्री राम जीवनात आचरणात आणले.त्याचा लाभ त्यांच्या सामाजिक संस्कृती ला खुप मोठ्या प्रमाणात झाला.प्रभु श्रीराम आपले आहेत आपले पुर्वज असून देखील आपण आजपर्यंत पाहिजे त्या प्रमाणात जाणून घेतले नाहीत हे आपलं दुर्भाग्य पण देर आये दुरुस्त आये या म्हणी प्रमाणे अगदी उशीरा का होईना पण प्रभु श्रीराम हे आपल्याला समजले आहेत आणि आपल्या जीवनात चरित्र निर्माण होण्यासाठी या क्षणाचा नक्कीच योग्य लाभ होईल.प्रभु श्री राम हे भारतीय सामाजिक धार्मिक संस्कृतीचे महानायक आहेत.हे वास्तव असून आज हेच वास्तव देशात मना मनात जे चैतन्य निर्माण झालं आहे त्यामधून प्रतित होत आहे.सामाजिक संस्कृती हि सामाजिक बदलाचा पाया असतो.हाच बदल सुसंकृत समाज घडवत असतो.आजचा उत्सव चैतन्य उत्साह ऐतिहासिक आहे प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हा आनंद ओसंडून वाहत आहे हा अगदी मन भरून येणारा क्षण आहे पण हाच क्षण जीवन बदलणार ठरला पाहिजे. प्रभू श्रीराम हे आदर्श जीवनाचे मानक आहेत. त्याग आणि सोडण्याची मनोवृत्ती हा प्रभु श्रीराम यांच्या जीवनाचा आधारस्तंभ असून दुसरयच घेणं तर सोडाच पण स्वतःच्या हिस्याच देखील सोडण्याची उदार वृत्ती प्रभू श्रीराम यांच जीवन चरित्र अधिक मजबूत करते.कालयुगात मानव ज्या पद्धतीने स्वार्थी होत चालला आहे त्या अनुषंगाने प्रभु श्रीराम यांच जीवन चरित्र आत्मसात केलं जीवनात अंगिकारल तर नक्कीच कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही.घर कुटुंब राष्ट्र सर्वांचं हित आणि कल्याण होण्यासाठी प्रभु श्रीराम यांच्या प्राण प्रतिष्ठापना दिनाचा क्षण नक्कीच परिवर्तनाची नांदी ठरेल.


हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

## रामलल्ला..!

आधुनिक केसरी

*चैत्रशुध्द नवमीला रखरखत्या*
*उन्हात श्रीराम जन्मे आयोध्यात*
*दशरथाच्या घरात*
*रामलल्ला भरलेले आहे*
*साऱ्या भक्तांच्या ऱ्हदयात*
*रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेने*
*मिळे सुखशांती जीवनात*

*सद्गुणांचे शिखर पुण्याचा*
*खजिना आहे श्रीराम*
*भक्तीभावाने रामलल्ला आहे*
*भक्तांचा हरिनाम*
*धन्य झाले श्रीरामाचे गुरु*
*विश्वमित्र महान*
*निष्ठावान सेवक लाभे आदर्श*
*जय-जय हनुमान*

*प्राणप्रतिष्ठेच्या उत्सवात*
*उच्चारे रघुनंदन*
*त्यागात पुढे भोगात मागे*
*हे सत्यवचन*
*पित्याच्या आज्ञाने वनवासाचे*
*केले पालन*
*रामलल्ला आणि सीतेची*
*नाजूक पावले फिरे वनवन*

*निष्ठावान आदर्श पतीपत्नी*
*एकवचनी*
*रामलल्लाचे दर्शन व्हावे*
*ईच्छा आहे मनी*
*भारत भूमीचा गौरव झाला*
*श्रीराम मुखानी*
*रामालल्लाही श्रेष्ठ होती*
*आयोध्या स्वर्गाहुनी...!*



अय्युब पठाण
लोहगांवकर
ता. पैठण, छत्रपती
संभाजीनगर
मो. ९७६४३५०३७४





# जय श्रीरामच्या गजराने दुमदुमली राजूरनगरी

## शोभायात्रेत अलोट गर्दी : सजीव देखावा ठरला आकर्षण, जागोजागी प्रतिमा पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा.बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजुर :** श्री गणपती संस्थान व सकल हिंदू समाज आयोजित श्रीराम जन्मभूमी प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र राजुर येथे आज भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती.कोट्यावधी भारतीयांचे श्रद्धास्थान असलेल्या रामाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. जय श्रीरामच्या गजराने राजूरनगरी दुमदुमली.शोभायात्रेत राम भक्तांची अलोट गर्दी जमल्याने संपूर्ण राजुर भगवेमय झाले होते.रथावरील राम,लक्ष्मण, सीता, हनुमान यांचा सजीव देखावा व श्रीरामाची भव्यमूर्ती शोभायात्राचे आकर्षण ठरले. महिलांकडून जागोजागी प्रतिमांची पूजन करण्यात आले. लेझीम,पावली, हलगी, ढोलताशा आणि डीजेच्या तालावर श्रीरामाचा जयघोष करत तरुणाई थिरकली. यावेळी मोठ्या प्रमाणात रंगीबेरंगी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त राजूर राममय झाले होते. सकाळपासूनच रामभक्तांमध्ये लगबग दिसून आली.मुख्य रस्त्याची सफाई करून त्यावर सडासंमार्जन व रांगोळी काढली होती.गावातील हनुमान मंदिरापासून शोभा यात्रेस प्रारंभ झाला. गणपती मंदिराच्या पायथ्याशी राम भक्तांचे एकत्रीकरण होऊन भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली.

यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय होती.पुरुषांनी पांढरावेश परिधान करून टोप्या घातल्या होत्या.व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानासमोर श्रीरामाचे होर्डिंग लावले होते तर फुलवाल्यांनी आपली दुकाने व परिसर आकर्षकपणे सजवला होता. प्राणप्रतिष्ठा सोहळा प्रवेशद्वार सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. शोभायात्रा मुख्यरस्त्यावर येताच राम भक्तांची गर्दी वाढली होती. संपूर्ण राजूर भगवेमय झाले होते. चिमुकल्यांनी केलेली राम, लक्ष्मण,सीता आणि हनुमानाची वेषभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.घोड्यावर स्वार झालेल्या रामा सोबत फोटो काढण्याचा मोह अनेकांना आवरला नाही.गळ्यात भगवे रुमाल व डोक्यावर टोपी घालून रामभक्त जय श्रीरामच्या घोषणा देत होते.वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात पावलीचा ठेका धरला होता. महिलांनी फुगड्या खेळून आनंदोत्सव साजरा केला.या कार्यक्रमात व्यापारी तसेच सामाजिक संस्थांकडून पाणी बॉटल व चहाचे वाटप करण्यात आले.

शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकात येताच शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. बसस्थानक मार्गे गणपती मंदिराच्या पायथ्याशी शोभयात्रेचा समारोप करण्यात आला.शेवटी श्रीराम जन्मभूमी अयोध्या येथून होणाऱ्या रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण गणपती संस्थांच्या सभागृहात रामभक्तांना दाखवण्यात आले.शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

केंद्रीय रेल्वेमंत्री ना .रावसाहेब दानवे यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रम रुपरेषा आखण्यात आली होती .कॉर्नर बैठका घेऊन नियोजन करण्यात आले होते .या कार्यक्रमास गणपती संस्थान,ग्रामपंचायत,व्यापारी महासंघ ,हिंदू संघटना, श्रीचे सेवेकरी, सकल हिंदू समाज ,सामाजिक कार्यकर्ते,पत्रकार,पोलीस प्रशासन,महावितरण यासारख्ये अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले .सर्वांच्या सहकार्यातून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला .

# रामनामाच्या गजरात आसमंत दुमदुमला; रिसोडनगरीत भक्तिमळा फुलला

## सर्वधर्मियांचा जल्लोष : न भूतो जनसागराची विराट शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** आयोध्या येथील मंदीरात होणाऱ्या प्रभु श्रीरामचंद्र यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्या निमित्त रिसोड शहरात शोभायात्रा काढण्यात आली आहे. त्याअनुषंगाने रिसोडसह, संपूर्ण तालुक्यातून आलेल्या सर्व धर्मियांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. जमलेल्या हजारो रामभक्तांच्या गजराने आसमंत दणाणून सोडला होता. जणू काही भक्तिमळा फुलल्याचे दृष्य सदर शोभायात्रेत पहावयास मिळत होते.

संपूर्ण तालुक्यातून सहभागी झालेल्या सर्व पक्ष, धर्मियांच्या सहभागाने काढण्यात आलेल्या शोभायात्रेत न भूतो असा विराट जनसागर प्रभु श्रीरामचंद्र यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्या निमित्त आज रिसोड शहरात पहावयास मिळाला असल्याचे अनेक जुनेजाणते लोक बोलत आहेत. राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरा करण्यात आलेल्या या सोहळ्यात असंख्य भगव्या पताका, राम मंदिराची सुरेख प्रतिकृती, भजनी मंडळे, लेझीम पथक, बँड बाजा पथक,तद्वतच विविध धार्मिक कलाकृती, आणि सर्व धर्म समभावाच्या संदेशाने सदर शोभायात्रा अधिकच भक्तिमय वातावरणाने खुलून गेली होती. राम भक्तांचा उत्साह आणि जल्लोष पहाता जणू काही ऋषिवट नगरीत प्रतिआयोध्या प्रगट झाल्याचा अनुभव आला असल्याचे अनेक भाविक भक्त बोलत होते. शहरातील जिजामाता चौक येथे भगवा ध्वज फडकावून शोभायात्रेची सुरुवात झाली. सिव्हील लाईन मार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सोनार गल्ली, जैन मंदीर, अष्टभुजा देवी चौक, आप्पा स्वामी महाराज चौक या मार्गाने मार्गक्रण करीत शहराच्या हृदयस्थानी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात महाआरती घेऊन शोभायात्रेची सांगता झाली. सदर कार्यक्रमात शहरासह तालुक्यातील विविध पक्षाचे लोकप्रतिनिधी,पदाधिकारी,वकील,डॉक्टर, इंजिनियर,तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला होता.



**ॲड . नकुल देशमुख यांचा विशेष सहभाग**

शहरातील गणमान्य आणि प्रतिष्ठित व्यक्ती, एड . नकुल देशमुख यांनी कार्यक्रमाच्या सादरीकरणावर आणि कलाकृती संबंधी विशेष मेहनत घेतली . त्यांनी केलेल्या आवाहनाला तालुक्यातील रामभक्तांनी भरभरून प्रतिसाद देत शोभायात्रेत सहभागी झाले होते . त्याचे फलीत म्हणून हा भव्य दिव्य कार्यक्रम पार पडला असल्याचे अनेक भाविक बोलत आहेत . शुभारंभ ते समारोप पर्यंत त्यांची कार्यक्रमातील उपस्थिती लक्षवेधी ठरली असल्याचे देखील यानिमित्ताने चर्चा होत आहे .

# स्वच्छतेसाठी दादा भुसे उतरले नदीपात्रात

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** महानगरपालिकेतर्फे सुरु असलेल्या विशेष महास्वच्छता अभियानात पालकमंत्री दादा भुसे यांनी सहभाग नोंदवला. हातात फावडा घेत येथील मोसम नदीपात्रात उतरुन भुसे यांनी महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छतेच्या कामास हातभार लावला. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या नागरी क्षेत्रांमध्ये विशेष महास्वच्छता अभियान हाती घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. या अभियानात शहरातील सर्व सार्वजनिक व खासगी मालकीच्या खुल्या जागा, नदी,नाले आदी ठिकाणांची स्वच्छता केली जात आहे. यावेळी पालकमंत्री भुसे हेदेखील या अभियानात सहभागी झाले. अधिकारी,कर्मचारी व सफाई कामगार अशा महापालिकेच्या जवळपास ४०० जणांनी श्रमदान करत ही स्वच्छता केली. त्यासाठी १० जेसीबी, १० ट्रॅक्टर, चार घंटागाड्या, तीन डंपर, एक पोकलॅण्ड असा लवाजमा लावण्यात आला होता.

# श्री रामचंद्र यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळयाच्यानिमित्त बाजार सावंगी येथे मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** आयोध्या नगरीत होत असलेल्या प्रभू श्री रामचंद्र यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने बाजार सावंगी येथे मिरवणूक करण्यात आली. त्यानंतर बजरंग दलातर्फे या ठिकाणी दूध महाप्रसादाचा वाटप करण्यात आलं व शालेय विद्यार्थ्यांनी या ठिकाणी प्रभु श्री रामचंद्र लक्ष्मण भगवान सितामाता बजरंग बली यांच्या वेशभूषा केल्या. व या ठिकाणी अयोध्या नगरीचे स्वरूप आले होते भगवे वातावरण होऊन जय श्री राम, प्रभू श्री राम चंद्र की जय आदी जयघोषाने परिसर दुमदुमला होता. सायंकाळी 4 वाजता संपुर्ण गावातून श्री राम प्रतिमेची वाजत गाजत मिरवणुक,7ते9 जगन्नाथ महाराज सांगळे यांचे कीर्तन व 9 वाजता महाप्रसाद कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता यावेळी बजरंग दलाचे सर्व कार्यकर्ते तसेच सरपंच अप्पाराव नलावडे,वसंतराव नलावडे, पोपट काटकर, ,ज्ञानेश्वर नलावडे, पूंजाजी अण्णा नलावडे, गीता बाल विद्या मंदिरचे प्रमुख दत्तात्रय गंडे,उमाशंकर कुसुहा , रायझिंग स्टार स्कूल चे विश्वंभर नलावडे, आदी ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते .





# बाळासाहेब ठाकरे - एक अजरामर व्यक्तिमत्त्व !





जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०


आधुनिक केसरी

**जो शून्यातून विश्व निर्माण करतो, इतिहासात त्याचेच नाव सोनेरी अक्षरांनी लिहिले जाते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे असेच एक अजरामर व्यक्तिमत्व. २३ जानेवारी हा त्यांचा जन्मदिन. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत मराठी माणसांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचे पाहून त्यांचे रक्त सळसळले आणि शिवसेना या संघटनेची स्थापना करून त्यांनी मराठी माणसाचे स्फुलिंग चेतवले. मराठ्यांना त्यांच्या न्याय हक्कासाठी लढण्यासाठी मानसिक बळ देण्याचे महत्कार्य त्यावेळी बाळासाहेबांनी केले. राज्यात मराठी आणि देशपातळीवर ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा त्यांच्यासारखा एकही नेता ना कधी झाला ना भविष्यात कोणी होईल.**

१९५० साली फ्री प्रेस जर्नल या नियतकालिकांच्या समूहामध्ये बाळासाहेब व्यंगचित्रकार म्हणून नोकरीला लागले. सामाजिक प्रश्नांना व्यंगचित्रांच्या माध्यमातून वाचा फोडण्याची त्यांची खुबी काही काळातच जनमाणसांना भावू लागली. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासोबतही त्यांनी काम केले आहे, पुढे नोकरी सोडून त्यांनी १९६० मध्ये स्वतःचे मार्मिक हे साप्ताहिक सुरु केले. समाजात घडणाऱ्या घटनांवर ते व्यंगचित्रांच्या माध्यमातून भाष्य करू लागले. त्यावेळचे ते पहिले व्यंगचित्रात्मक साप्ताहिक होते. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊनही मुंबईत मराठी माणसांना दिली जाणारी सापत्न वागणूक त्यांना अस्वस्थ करत होती. मराठी माणसांवर होणाऱ्या अत्याचारांना त्यांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून वाचा फोडली. मराठी माणसांना त्यांच्या न्यायिक हक्कासाठी लढण्याची प्रेरणा बाळासाहेबांनी मार्मिकच्या माध्यमातून केली. अल्पावधीतच मार्मिकचा जसा खप वाढला तसा मराठी माणूस जागा होऊ लागला. महाराष्ट्रात राहून मराठी माणसाच्या हाताला रोजगार नव्हता, सामाजिक विषमतेला मराठी माणूस बळी पडत होता. मराठी माणसात अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची क्षमता आहे, मात्र त्याला कुशल नेतृत्व नसल्याने तो विखुरला गेला आहे हे लक्षात आल्यावर १९६६ मध्ये बाळासाहेबांनी शिवसेना या मराठी अस्मितेसाठी लढा देणाऱ्या संघटनेची स्थापना केली. ३० ऑक्टोबर १९६६ या दिवशी शिवसेनेचा पहिला मेळावा शिवाजी पार्क मैदानावर पार पडला ज्याला ५ लाखाहून अधिक मराठी माणसांनी हजेरी लावली होती. तेव्हापासून बाळासाहेबांचे नाव देशभरात प्रसिद्ध झाले. १९६६ पासून आजतागायत शिवाजी पार्कचा दसरा मेळावा आणि एकनिष्ठ मराठी माणसांची गर्दी हे समीकरण अबाधित राहिले आहे. आज बाळासाहेब आपल्यात नसले तरी शिवसेनेवर प्रेम करणारे संघटनानिष्ठ शिवसैनिक आजही जनमानसांत आहेत.

राज्य स्तरावर मराठी आणि राष्ट्रीय स्तरावर हिंदुत्व हे धोरण शिवसेनेने अवलंबले. मराठी माणसांना न्याय मिळवून देण्यासाठी राजकारणात प्रवेश करून सत्ताधाऱ्यांवर दबाव आणणे आवश्यक आहे हे ओळखून शिवसेनेने ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हे सूत्र ठरवून राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच मुंबई महापालिकेची सत्ता हस्तगत केली. महापालिकेवर भगवा फडकला. तेव्हापासून मधला काही काळ वगळता मुंबई महापालिकेवर



शिवसेनेचा भगवा सदैव डौलाने फडकत राहिला आहे. १९९५ साली भारतीय जनता पार्टीसोबत सोबत युती करून बाळासाहेबांनी मनोहर जोशींच्या रूपाने शिवसेनेचा पहिला मुख्यमंत्री राज्यावर बसवला. शिवसेनेच्या नेत्यांना लोकसभेच्या निवडणुकीत विजयी करून बाळासाहेबांनी काही खासदारही लोकसभेत पाठवले. १९८९ मध्ये बाळासाहेबांनी सामना हे शिवसेनेचे मुखपत्र म्हणून दैनिक सुरु केले. महाराष्ट्रात राहून देशभरातील हिंदूंना त्याकाळी त्यांचा आधार होता. आज रामजन्मभूमी अयोध्येत उभे राहिलेले श्रीरामांचे भव्य मंदिर हे बाळासाहेबांचे स्वप्न होते. बाळासाहेबांच्या जयंतीच्या आदल्या दिवशी ते पूर्ण झाले. 'बाबरी मशीद जर माझ्या शिवसैनिकाने पाडली असेल, तर मला त्याचा अभिमान आहे' अशी स्पष्ट भूमिका घेऊन त्यांनी ज्वलंत हिंदुत्व म्हणजे काय असते हे हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्या आणि पक्षांना आणि संघटनांना त्यांनी दाखवून दिले होते. अमरनाथ यात्रा रोखू पहाणाऱ्या अतिरेक्यांना बाळासाहेबांनी मुंबईतून ठणकावल्यानंतर अतिरेकीही वरमले होते, एव्हढा दरारा त्यांनी निर्माण केला होता. देशावर प्रेम करणारा प्रत्येक मुसलमान माझा आहे असे म्हणून त्यांनी देशप्रेमी मुसलमानांनाही संरक्षण दिले होते. कोणत्याही राजकीय पदाचा मोह न बाळगणारे बाळासाहेब मातोश्रीवर येणाऱ्या प्रत्येक पाहुण्यांशी राजकारण सोडून बोलत होते. त्यामुळे दर्यादिल माणूस म्हणूनही त्यांची ख्याती आहे.
१७ नोव्हेंबर २०१२ या दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या जाण्याने देशाच्या राजकारणात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. कोणाचीही भीडभाड न बाळगता आपल्या तत्वांशी एकनिष्ठ राहून राजकारण करणारा असा नेता पुन्हा होणे नाही.

# अवैध व्यवसायाचा अश्व चौखूर उधळतो

## भोकर पोलीसांनी 'लगाम' केला सैल : अनेकांचे संसार उघड्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरासह तालुक्यात बंदी घालेला गुटका सहज मिळतो, गल्लीबोळात मटक्याची आकडे खूलेआम गीरवले जात आहेत, अवैध वाहतूक,पत्याचे क्लब असे विविध धंदे "सैराट" झाले आहेत.अनेक यूवक धंद्यात अडकल्याने संसार उघड्यावर आले आहेत. अशा रथाचा "लगाम" पोलीसांनी सैल केल्याने "अश्व" चौखुर उधळतो आहे.वरिष्ठानी याकडे लक्ष देवून अवैध धंदे त्वरित हद्दपार करावे अशी नागरिकांची मागणी आहे.

शहरात प्रारंभी काहि चाणाक्ष चांडाळ चौकडीनी चोरीछूपे अवैध धंद्यात हात घातला होता.वर पासून ते खाल पर्यंत संबंधितांना "दक्षणा" देवून चांगभल करून घेतल. नागरीकाच्या तक्रारी वाढल्याने नाममात्र गून्हे दाखल करून व्यवसायिकांना रान मोकळे करून देण्यात आले.
सध्या शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय फोफावले आहेत.यात प्रामुख्याने शासनाने बंदी घालण्यात आलेला रसायन मिश्रीत गुटका पुडी तालुक्यात सहज उपलब्ध होत आहे.शहरात गुटका माफीयाने गोदामात लाखोरूपयाचा अवैध साठा करून ठेवला आहे. गोळ्या बिस्किटचे होलसेल दुकान विक्रीच्या नावाखाली खूलेआम गुटका दिला जातो आहे.
चोरीछूपी सूरू असलेला मटका आता खूलेआम सुरू झाला आहे.गल्लीबोळात बुक्कीची चलती आहे.मटका कींग आणि संबंधित अधिकारी यांचे "मनोमिलन "झाल्याने अवैध मटका "वैद्य" झाल्याचे दिसून येत आहे. याशिवाय शहरा बाहेर शेतीच्या आखाड्यावर जुगार,पत्याचे क्लब चोरीछूपे खेळले जात आहेत.

**देशी दारूची तस्करी :** शहरात अधिकृत शासनमान्य देशी दारूची दूकान असून दुकानदार ग्रामीण भागात दारूचे पार्सल घरपोच देण्याची स्वतंत्र व्यवस्था केली आहे .मटन हॉटेलवर विनापरवाना दारू विक्री केली जात आहे .

**अवैद्द वाहतूक जोमात :** शहरातील मूख्य चौकात भररस्त्यात चारचाकी वाहने उभी करून अवैध प्रवासी वाहतूक सुरू आहे .यातुन पोलीसांना "वरकमाई " होत असल्याने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत .आगार प्रमुख आणि नागरीकानी अनेक वेळा तक्रारी करूनही काही उपयोग झाला नाही .

# पोलीस बंदोबस्तात मुलीवर अंत्यसंस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** देवळाली कॅम्प परिसरात दोन गटात झालेल्या वादात पोलिसांच्या ताब्यात असलेल्या संशयिताच्या मुलीचा शनिवारी रुग्णालयात मृत्यू झाला. नातेवाईकांनी मृतदेह थेट पोलीस आयुक्तालयाच्या आवारात आणल्याने खळबळ उडाली. पोलिसांनी हे प्रकरण संयमाने हाताळल्याने मृतदेहावर गावात अंत्यसंस्कार करण्यात आले.देवळाली कॅम्प परिसरातील संसरी गावात सागर गोडसे व हर्षद त्रिभूवन आणि त्याच्या नातेवाईकांमध्ये काही कारणावरून वाद झाले होते. या वादाचे पर्यावसान मारहाणीत झाले. या प्रकरणी देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हर्षद व त्याच्या दोन नातेवाईकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सागरच्या दोन वर्षाच्या मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आले असतांना तिचा शनिवारी मृत्यू झाला.

# काव्यसंमेलनाध्यक्षपदी रज्जाकभाई शेख यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्था पुनतगाव जिल्हा अहमदनगर यांच्यावतीने



सप्तपदी मंगल कार्यालय नेवासाफाटा जिल्हा अहमदनगर येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त राज्यस्तरीय निमंत्रितांचे कविसंमेलन रविवार दिनांक अठ्ठावीस जानेवारी दोन हजार चोवीस रोजी आयोजित केले आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडणार आहे. शिवस्वराज्य संस्थेच्या कविसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून साहित्यिक प्रसिद्ध गजलकार रज्जाकभाई शेख यांच्या निवडीची घोषणा शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संजय वाघमारे यांनी केली आहे. यावेळी औरंगाबाद संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील,माजी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख ,आमदार लहुजी कानडे, नागेबाबा मल्टिस्टेटचे कडूभाऊ काळे,महंत सुनीलगिरी महाराज आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.संमेलनात स्थानिक कविसह राज्यभरातील निमंत्रित कवी , कवयित्री , कवितेचे अभ्यासक सहभागी होत आहे.
श्रीरामपूर येथील ग्रामीण साहित्यिक रज्जाकभाई शेख यांनी विविध राज्यस्तरीय संमेलनात आपल्या कवितेचे उत्तम सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली आहेत.शेख यांनी जीवन गौरव शैक्षणिक मासिकाच्या माध्यमातून वाचनलेखन चळवळीत सक्रिय राहून काम केले आहे. त्यांच्या दीड हजारापेक्षा जास्त कविता विविध वृत्तपत्र, मासिके व दिवाळी विशेषांक यांत प्रकाशित झालेल्या आहेत.
विनोदी कथा लेखनातूनही त्यांनी वाचकांना प्रेरणा दिली आहे. शिक्षणाचा वारसा चालवताना मनातील भावनांना शब्दबद्ध करून कविता ,कथा लेख, यांचे लेखन तसेच हास्यकविता,लेख,हायकू,अभंग, प्रेमकविता, गझल,काव्यांजली, अष्टक्षरी, गजल आदी काव्यप्रकारात लेखन केले आहे. आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन गुजरात,अखिल भारतीय साहित्य संमेलन उस्मानाबाद,आखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलन पुणे,अखिल भारतीय साहित्य संमेलन नाशिक येथे त्यांच्या कवितांची निवड झाली आहे. शिरूर येथील राज्यस्तरीय कविसंमेलन, कन्नडचे तिफण संमेलन, श्रीरामपूर येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संमेलन तसेच, औरंगाबाद येथील कविसंमेलनाचे ते माजी संमेलनाध्यक्ष आहेत. संजय वाघमारे, धिरज कांबळे, बाबासाहेब शिरसाठ, सुनिल चव्हाण,ताईसाहेब वाघमारे, चंद्रकांत मोरे, सतिश म्हस्के, शांतवन खंडागळे, सुनील शिंदे, हरीश चक्रनारायन, आनंदा साळवे परिश्रम घेत आहे.

# 37 वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा देत वर्गमित्र आणि शिक्षक एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या इयत्ता दहावीच्या वर्षी 1987 च्या विद्यार्थ्यांचा रविवारी (ता:२१) स्नेहसंमेलनाचा मेळावा जय भवानी लॉन्स मध्ये पार पडला. तब्बल 37 वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा देत तीच शाळा मैदान वर्ग मित्र आणि ते शिक्षक यामुळे सर्व एकच आल्याने भावुक झालेत अनेक उच्चशिक्षित होऊन मोठ मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. काही शिक्षक मुख्याध्यापक डॉक्टर अभियंता पत्रकार पोलीस प्रशासन राष्ट्रीयकृत बँक कृषी व्यावसायिक सहकार व पतसंस्था जिल्हा परिषद वरिष्ठ लिपिक कर्मचारी कंपनी व्यवस्थापक व कर्मचारी अशा अनेक व्यवसायासह शेतकरी राजकीय पदाधिकारी फोटोग्राफर व्यापारी व अन्य व्यवसायात आज सुखी संपन्न कौटुंबिक जीवन व कर्तव्य बजावताना आनंद व्यक्त करीत आपापले विचार मांडत होते.
परस्परांचा स्नेह सुखदुःखांच्या आठवणी त्यांना उजाळा परस्परांच्या भेटीगाठी घेत सर्वांना ते आज अभिमानास्पद एकत्र येऊन किती बोलावे काय सांगावे यापुढे सहवास लागेल का अशा आशेने आस्थापूर्वक बोलत होते काही मुंबई नवी मुंबई पुणे जळगाव महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये लहान मोठ्या पदांवर कार्यरत आहेत त्यात सर्वांनाच गौरव अभिमान वाटला सरस्वती पूजन आणि गुरुजनांचा शाल पुष्पगुच्छ श्रीफळ देऊन सत्कार केला तर विद्यार्थिनी शेख हसीना शेख जफर यांनी देखील शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच चंद्रकांत नलावडे यांनी देखील श्रीमद् भगवत गीता ग्रंथ सर्वांना सप्रेम भेट दिला. सुरुवातीस दिवंगत शिक्षक व विद्यार्थी मित्रांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी तत्कालीन शिक्षक रत्नाकर काळे श्रीधर पाटील साहेबराव निकम श्रीनिवास गुळवे श्री पाठक श्री लोखंडे श्री जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. 60 ते 70 वर्गमित्र मैत्रिणी पत्नी व पतीच्या अशा शंभर ते दीडशे वर्गमित्रांना मोबाईल द्वारा सहज एकत्र आणता आले. तालुक्यातील गावांसह अन्य गावांचे वर्गमित्र भेटीसाठी जमले. शालेय जीवनातील सर्वांनी आपापला परिचय गमती जमती शिक्षण व अनुभव कर्तव्याची जाणीव करून दिली. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन सुधाकर आवटे सतीश वेता ळ शेखनाथ अधिकार अविनाश काळे अजय जैन प्रमोद निकम यांनी केले. सूत्रसंचालन सुधाकर आवटे यांनी करून सतीश वेता ळ यांनी आभार मानले सर्वांना पाच वाजता स्नेह भोजनाचा आनंद घेत सर्वांनी परस्परांचा निरोप घेतला.







# अवघे चंद्रपूर राममय झाले; अनेक मंदिरांवर रोषणाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अयोध्या मध्ये प्रभू श्री रामचंद्रांच्या भव्य मंदिरामध्ये रामललांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा नुकताच पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सोहळ्याच्या अनुषंगाने संपूर्ण देशभरातील नागरिकांना आपापल्या गावातील सर्व मंदिर स्वच्छता अभियान राबविण्यासोबतच या दिवशी भजन कीर्तन सोहळा करत हा उत्सव दिवाळीचा उत्सव म्हणून साजरा करावा असा आवाहन केले होते. देशाच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या या आवाहनाला चंद्रपूरकरांनी अलोट प्रतिसाद देत चंद्रपुरातील ठीक ठिकाणी असलेल्या वेगवेगळ्या मंदिरांमध्ये आजूबाजूच्या नागरिकांनी स्वच्छता मोहीम हाती घेतली. एवढेच नव्हे तर महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सुद्धा मंदिर स्वछता अभियानामध्ये आपला सहभाग नोंदविला. माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांनी सुद्धा मंदिरातील स्वच्छता करत मोदीजींच्या आव्हानाला प्रतिसाद दिला . तर चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांनी सुद्धा स्थानिक महाकाली मंदिर येथे स्वच्छता अभियान राबवत देशाचे पंतप्रधान मोदी तथा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत स्वच्छता मोहीम हाती घेतली. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने शहरांमध्ये ठिकठिकाणी असलेल्या मंदिरात अवतीभवतीच्या परिसरात भव्य अशा रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या . महिलांनी रात्रीपासूनच रांगोळ्या काढायला सुरुवात केली होती. अनेक मंदिरांवर रोषणाई करण्यात आली तर ठीकठिकाणी भजनांचा कार्यक्रम सुद्धा भाविक तल्लीन झाले होते. एकूणच संपूर्ण चंद्रपूर आज राममय झालेलं दिसत होत.

या सोहळ्याच्या अनुषंगाने आज चंद्रपूरमध्ये काही उत्साही युवकांनी बाईक रॅली काढत भगव्या ध्वजासह आपला उत्साह जय श्रीराम जय श्रीराम चे नारे देत व्यक्त केला. महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी " सियावर रामचंद्र की जय " या 11 अक्षरी मंत्राला पणत्यांनी प्रज्वलित करीत विश्वविक्रम नोंदविला. तर तीन दिवस स्थानिक चांदा क्लब ग्राउंड येथे भव्य कार्यक्रमांचे आयोजन करत चंद्रपूरकरांचं एकूणच वातावरण राममय केलं . चंद्रपूर विधानसभा निर्वाचन क्षेत्राचे आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर येथील प्राचीन आणि चांद्रपूरकरांच आराध्य दैवत असलेलं महाकाली मंदिराला स्वच्छता अभियान राबविल. त्यांचा यंग छंद ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन त्यांनी राबविलेल्या या अभियानामुळे परिसरात एकदम स्वच्छता पाहायला मिळाली. तर स्थानिक गांधी चौक येथे त्यांनी सुंदर कांड , भजन कीर्तन सोहळा करत अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण चंद्रपूरकराना करून दिले. शिवाय गांधी चौक येथे श्रीरामाच्या प्रतिमेला माल्यासर्पण करत चंद्रपूर हा भाताचा जिल्हा म्हणून ओळख असल्यामुळे प्रभु श्रीरामांच्या चरणी 11 प्रकारच्या वेगवेगळ्या तांदळाचा भात करून त्यांना अकरा वेगवेगळ्या भातांचा नैवेद्य समर्पित केला.

अतिशय जुन्या असलेल्या काळा मंदिरामध्ये महाराष्ट्राचे वन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सपत्नीक पूजा करून त्या ठिकाणी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे थेट प्रक्षेपण पाहिले. या सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण चंद्रपूर हे रोषणाईने उजळून निघाले होते. तर चंद्रपुरातील विविध मंदिरांवर सुद्धा आकर्षक रोशनाई करण्यात आलेली होती. वेगवेगळ्या मंदिरांमध्ये वेगवेगळ्या रांगोळ्या सुद्धा काढण्यात आलेल्या होत्या. एकूणच संपूर्ण चंद्रपूर हे राममय झालेले पाहायला मिळत होते. स्थानिक बाजारपेठेमध्ये सुद्धा या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर भगवे टी-शर्ट भगवे बंगाली आणि मोठ्या प्रमाणात भगवे ध्वज विक्रीला ठेवण्यात आलेले होते त्यामुळे बाजार परिसरात सुद्धा या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा एक वेगळाच प्रभाव पाहायला मिळाला. राममंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने चंद्रपुरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक संघटना, संस्था तसेच विविध मंदिर समित्यांनी सुद्धा महाप्रसादाचे आयोजन केलेले होते . ठीक ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या या महाप्रसादामुळे सुद्धा चंद्रपूरमध्ये भक्तिमय वातावरण पाहायला मिळत होते.

# पैठण शहरात आजपासून सीसीटीव्ही

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेले पैठण शहरात आता मुख्य रस्ते तसेच विविध भागात ८० सीसीटीव्ही कॅमेर्याची नजर आसणार आहे. संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या प्रयत्नातुन शहरात ८० कँमेरे बसविण्यात आले आसुन सोमवार 22 रोजी पैठण पोलीस स्टेशन मधील यंत्राच्या ठिकाणी ना.संदिपान भुमरे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

पैठण शहरातील प्रमुख चौक, सर्व शाळा, महाविद्यालय परिसर, पोलीस ठाणे, दवाखाना, बसस्थानक परिसर, धार्मिकस्थळे या ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आले आहे. पैठण हे तिर्थक्षेत्र आसल्याने नागरीकाची रोजच मोठी गर्दी आसते तसेच चोरी, घरफोडी, रोडरोमिओ, सामाजिक कुरबुरी, सामाजिक तेढ निर्माण करणे, संशयास्पद मृत्यू आदी घटनांमध्ये सहभागी असलेले सर्व चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होणार आहेत. महिला आणि मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कॅमेरे खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. हे सर्व कॅमेरे वायरलेस असून त्यांचे लाईव्ह फुटेज पैठण पोलीस ठाण्यात दिसत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यास आणि सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा होण्यास मदत होईल. त्यामुळे आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून पैठण शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नागरिकांवर करडी नजर ठेवणार आहोत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे महिलांची सुरक्षा वाढणार असून,पाकीटमार,मोटारसायकल चोरीला नक्कीच आळा बसेल आसा विस्वास उपविभागीय पोलीस अधिकारी दत्तात्रय भवर यांनी व्यक्त केला. यावेळी दुध संघाचे संचालक नंदलाल काळे,पोलीस निरीक्षक संजय देशमुख,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवन लोहीया,विजय पापडीवाल,सुनील बलदवा,मुख्याधिकारी संतोष आगळे,धर्मराज उजगरे,विजय सुते,रघुनाथ ईच्छया,बलराम लोळगे,सह पोलीस कर्मचारी व न.प.चे कर्मचारी उपस्थित होते.





# स्वामी समर्थ मंदिर, म्हाडा कॉलनी येथे महाआरतीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्या येथे होणाऱ्या श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा समारोह उत्सवनिमित्त श्री रामाची मूर्ती ठेवून त्या ठिकाणी स्वामी समर्थ मंदिर कमिटीच्या वतीने मूर्तीचे पूजन करून महाआरती मंदिर कमिटीचे अध्यक्ष संतोष लिंबेकार बोरसे अण्णा साखरे सर श्रीधर दीक्षित विजय पाटील कुलकर्णी बाप्पा यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. या वेळी मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी परिसरातील रामभक्त नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यामध्ये युवा नेते काँग्रेस पक्षाचे सुभाष पांडभरे पाटील विष्णू गुंठाळ किशोर बिनीवाले मुरदारे, नांगरे काका, रमेश राहणे, गुंडाले साहेब, उषा पंगुंडवाले, स्वाती लिंबेकर, सौ. राऊत, ओंकार लींबेकर, सुनंदा मस्के, लता गाडेकर रुक्मिणी खांडकवरे, राज वाघ ,शुभम कार्ले, सुशील जायभाय, परीक्षेत पाटील, समीर जोशी, राहुल शिरसागर, कृष्णा भालेकर, भिकन गायकवाड, प्रकाश पाटील इत्यादी मान्यवरासह सह परिसरातील रामभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले स्थानिक रहिवाश्यांनी सडा आणि रांगोळी काढून परिसर सुशोभित केला होता.

श्रीरामभक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. श्रीराम जयघोषाने अवघे वातावरण भक्तिमय झाले होते. सायंकाळी 7:00 वाजता दीपोत्सव साजरा करून समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन उत्सव समिती स्वामी समर्थ मंदिर कमिटी म्हाडा कॉलनी मूर्तीजापुर छत्रपती संभाजीनगर यांनी केले होते.

# श्रीराम भक्तांकडून महाप्रसादाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** संपूर्ण भारत देशात प्रभु श्री राम यांच्या प्राण प्रतिष्ठान सोहळ्या निम्मिताने वेगवेगळ्या प्रकारे भक्तगणं उत्सव साजरा करत असून वैजापूर शहरातील फुलेवाडी रोड या ठिकाणी सुद्धा श्री राम भक्तांकडून ह्या अद्भुत सोहळ्यानिम्मित महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसाद कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी फुलेवाडी रोड वैजापूर येथील रामदास दाणे, अशोक कुमावत, मनोज खैरनार,शुभम शेगावकर,राजू क्षीरसागर, गणेश साळुंके,विजय महाजन,पार्थ महाजन, माऊली वाघ, बाबासाहेब भागवत,सचिन दाणे, दादासाहेब कुमावत आदींनी मेहनत घेतली असून प्रसंगी बाल गोपाल राज कुमावत, चैत्यन वाघ,निकेश कुमावत,रुद्रा दाणे, समर्थ भागवत, सिद्धी वाघ यांनी सुद्धा सहभाग नोंदविला या प्रसंगी या अद्भुत सोहळ्याचे प्रक्षेपण नियोजन सुद्धा या ठिकाणी कारण्यात आले होते तथा मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती दाखवत महाप्रसादाचा लाभ घेतला.



# पिंपळवाडीत मटन, चिकन व दारूबंदी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पिंपळवाडी, महाल्बदा ग्रुप ग्रामपंचायत पिंपळवाडी छोट्या गावात अयोध्या येथे श्रीराम मंदिर उद्घाटन मोठा सोहळा दि.२२ जानेवारी २०२४ ला संपन्न होत असल्याने.या निमित्ताने मटन, चिकन,मच्छी व दारु कोणी विकणार नाही याची खबरदारी घ्यावी असे आवाहन सरपंच वंदना सतीश सावंत यांनी केले होते. विकल्यास त्यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा गंभीर इशारा दिला होता.२२ जानेवारीला गावात चिकन,मटन, मच्छी व दारु बंद होती. थेंबभरदेखील दारू कोणीही विकली नाही.यावेळी महिला वर्गाने मटन, चिकन, मच्छी व दारूबंदीचा ठराव मांडला होता. या ठरावावर ग्रामसभेत सविस्तर चर्चा होऊन एकमुखाने मटन, चिकन, मच्छी व दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला. असे सरपंच वंदना सतीश सावंत यांनी जाहीर केले. यावेळी ग्रामसेवक एन जी गोरे, मंगला आळेकर,तानाजी सोनुले, प्रियांका बन्डे,आशा जाधव, सुरेश खरे यांच्यासह ग्रुप ग्रामपंचायत सदस्य, महिला, युवक, वारकरी उपस्थित होते. सर्व मटण, चिकन, मच्छी व चायनीज विक्रेत्यांना तसेच मांसाहारी हॉटेल व धाबा मालकांना कळविण्यात आले होते की श्री क्षेत्र अयोध्या धाम येथे श्री राम मूर्ती प्राणप्रतिष्ठा उत्सव सोमवार दि.२२/०१/२०२४ रोजी होणार असून आपल्या गावामध्ये हानुमान मंदिर येथे मोठा उत्सव साजरा होणार करण्यात आला.

सर्व विक्रेत्यांनी दुकान धारकांनी ह्या सूचनेची दखल घेवून पालन केले.आणि आप आपले सर्व धंदे बंद ठेवून सहकार्य केले अशी माहिती सरपंचपती सतीश सावंत यांनी बोलताना दिली.




# राम वंदना करीत जेजुरी गडावर श्रीराम अयोध्या उत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** जयश्रीराम येळकोट येळकोट जय मल्हार गर्जना करीत जेजुरी ग्रामस्थ खान्देकरी मानकरी सेवेकरी सह गुरव पुजारी मंडळ तसेच जेजुरी देवस्थान ट्रस्टी च्या वतीने खंडोबा देवाला महाअभिषेक घालीत श्रीराम खंडोबा देवभेट घडवीत श्रीराम अयोध्या उत्सव साजरा केला तर सासवड येथील नृत्य कला संस्कार संस्थेच्या कलाकारांनी नृत्य रामायण सादर करीत आकर्षक अशी राम वदंन सादर केली यावेळी हरिद्र पूजनही करण्यात आले या मंगल प्रसंगी पुणे धर्मदाय आयुक्त सुधीरकुमार बुक्के तसेच श्री मार्तंड देवसंस्थान विश्वस्त डॉ राजेंद्र खेडकर, ऍड पांडुरंग थोरवे, विश्वास पानसे,मंगेश घोणे अभिजित देवकाते अनिल सौन्दडे आणि खान्देकरी मानकरी मंडळ अध्यक्ष जालिंदर खोमणे, छबन कुदळे. अलका शिंदे,ग्रामस्थ राजेंद्र चोधरी, राजेंद्र पेशवे, कला सिद्धी नृत्यल्याचे सयोजक धनश्री स्वानंद लोमटे आदी मान्यवर उपस्थिती होते भंडाऱ्याची उधळण जय मल्हार जयश्रीराम गर्जना करण्यात आली शैव आणि वैष्णवाचे माध्यमिक रूप असलेल्या मल्हारी मार्तंड मंदिरावर अनुपम असा श्रीराम उत्सव सोहळा पार पडला.

# राम मंदिरासाठी वडिलांनी लाठ्या खाल्ल्या

## रोहिणी खडसे यांचा दावा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** अयोध्येत होणारे राम मंदिर हा सर्व हिंदूचा श्रद्धेचा विषय आहे. या मंदिरासाठी माझ्या वडिलांनी लाठ्या खाल्ल्या आहेत. भाजपकडून मंदिरातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमास एखाद्या सोहळ्यासारखे स्वरूप दिले गेले असून ते चुकीचे असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी सांगितले. सक्तवसुली संचनालयाकडून विरोधी पक्षातील नेत्यांना बजावल्या जाणाऱ्या नोटीस हा भाजपच्या दबाव तंत्राचा भाग असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर खडसे सध्या राज्य दौऱ्यावर आहेत. शनिवारी नाशिक येथे त्यांनी महिला पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र खडसे यांच्या हस्ते देण्यात आले. पत्रकारांशी संवाद साधताना खडसे यांनी विविध मुद्यांकडे लक्ष वेधले. अयोध्येत मंदिर अपूर्ण असताना मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असून हे चुकीचे आहे. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम निमंत्रितांसाठी असून ही गर्दी कमी झाल्यानंतर नक्की दर्शनाला जाईल, असे खडसे यांनी सांगितले. वंचित बहुजन आघाडीशी युतीविषयी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. बैठकीत निर्णय होईल. यानंतर चित्र स्पष्ट होईल. सध्या सक्तवसुली संचनालयाकडून (ईडी) विरोधी पक्षातील नेत्यांना नोटीस बजावल्या जात आहेत. हे दबावतंत्र आहे. भाजप ज्यांच्या विरोधात बोलतो, त्याला ईडीची नोटीस बजावली जाते.



# रोहित पवार यांची राष्ट्रवादीच्या जिल्हा प्रसिद्ध प्रमुखपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** बुलढाणा येथे १९ जानेवारी रोजी झालेल्या जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या आढावा बैठकीत रोहित पवार यांची जिल्हाप्रसिद्ध प्रमुख पदी निवड करण्यात आली.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष माननीय महबूब भाई शेख यांच्या उपस्थितीत काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली याच बैठकीमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पराग अवचार काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष महबूब भाई शेख,झिया उल हक जिल्हा कार्यध्यक्ष यांनी रोहित पवार यांची राष्ट्रवादीच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# पत्रकार सतीश पाटील शिंदे यांना राज्यस्तरीय शिवछत्रपती प्रेरणा पत्रकार पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** येथील दैनिक पुढारीचे तालुका प्रतिनिधी पत्रकार सतिष पाटिल शिंदे यांना माणुसकी मल्टीपर्पाज फाऊंडेशन मलकापूर बुलढाणाच्या वतीने 2024 वर्षाचा राज्यस्तरीय शिवछत्रपती प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे त्या आशयाचे पत्र प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष विवेक राजापूरे यांनी जाहीर केले आहे.

सतिष पाटिल शिंदे हे मागील 15 वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत .विविध प्रकारच्या सामजिक व धार्मिक कार्यात देखील अग्रेसर असतात. अभ्यासू तत्वनिष्ठ आणि निर्भिड पत्रकार म्हणून त्यांची ओळख आहे. मागील वर्षी राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते लोकमान्य टिळक पत्रकारिता पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

दिनाक 11 फेब्रुवारी रोजी राजे शिवछत्रपती राज्यस्तरीय प्रेरणा पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

माणुसकी मल्टी पर्पाज फाऊंडेशन मलकापूर जिल्हा बुलढाणा या संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष विवेक राजापुरे हे दरवर्षी सामाजिक,कृषी , पत्रकार अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्काराने सन्मान केला जातो. यंदाच्या वर्षी चां राज्यस्तरीय प्रेरणा पत्रकार पुरस्कार नांदेड जिल्हयातील धर्माबाद येथील पत्रकार सतिष पाटिल शिंदे यांना जाहीर करण्यात आला ही बाब कौतुकास्पद आहे.

# करिअर संसदेमध्ये रामकृष्ण वाघ कला वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टिकोनातून उच्च शिक्षण अंतर्गत करियर कट्टा वेगवेगळ्या महाविद्यालयांमध्ये स्थापना करण्यात येतो . या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांची माहिती व्हावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा असा प्रयत्न करण्यात येत असतो. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून नुकतच बारामती येथे दोन दिवसीय करिअर संसद अधिवेशन पार पडले.

या करिअर संसदेतील पदाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनात रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स च्या समन्वयकासह विद्यार्थ्यांनी सहभाग घेत वेगवेगळ्या नवीन विषयांची माहिती करून घेतली.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट संचालित शारदाबाई पवार महिला कॉलेज यांच्या वतीने शारदानगर तहसील बारामती येथे करिअर संसद या नावाने विद्यार्थ्यांचे दोन दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले . या अधिवेशनासाठी राज्यातील अनेक महाविद्यालयातील करीयर कट्टा संसदेतील पदाधिकारी विद्यार्थी विद्यार्थ्यांनी उपस्थित होते. त्यामध्ये विदर्भ , कोकण , मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील चारशे विद्यार्थ्यांचा समावेश होता. अशा भव्य दिव्य राज्यस्तरीय अधिवेशनात महाविद्यालयीन समन्वयक प्रा . सचिन देशमुख आणि हार्दिक वानखेडे (बी. ए तृतीय वर्ष),उत्कर्ष निनावे आणि शुभम मेश्राम (बी. ए प्रथम वर्ष) या विद्यार्थ्यांनी आपल्या औद्योगिक केंद्रीय भेटीवरील



कोराडी येथील पावर प्लांट प्रेझेंटेशनसह सहभाग नोंदविला.

या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान केंद्र बारामती, आप्पासाहेब पवार सायंटिफिक रिसर्च इन्स्टिटय़ूट, डॉ.शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ एग्रीकल्चर, कॉलेज ऑफ अग्री बिझनेस मॅनेजमेंट इनोव्हेशन अँड इंक्युबॅशन सेंटर बारामती आशा वेगवेगळ्या ठिकाणी भेटी देत तेथील कार्यपद्धती, अभ्यासक्रम याविषयीची माहिती घेतली.

छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या वतीने आदरणीय संचालक डॉ. मारोती वाघ, संस्थेच्या संचालिका सौ. लता वाघ, प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना कहाळे पत्की ,सांस्कृतिक विभाग प्रमुख व महाविद्याल करीयर कट्टा समन्वयक सायली लाखे पिदळी यांनी सगळ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि विद्यर्थ्यांचे अभिनंदन केले.



# येसगाव नं२ येथे नारळ झाडांचे वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे येसगाव नं दोन येथील ग्रामपंचायत अंतर्गत रस्ता व इमारत गाव लगत ठिकठिकाणी नारळ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

ग्रामपंचायत येसगाव नं २ येथे पंचायत समिती बांधकाम विभागचे शाखाभियंता श्री नरेंद्र देशमुख यांनी ५० नारळ झाडांचे रोप उपलब्ध करून दिले.तर त्यात योगायोग आज त्यांचा वाढदिवस असल्याने यातच त्यांचा मोठ्या थाटात वाढदिवस साजरा करण्यात आला तर देशमुख यांचे गावकऱ्यांतर्फे वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आले मंदिर परिसर व रस्त्याच्या दुतर्फा नारळाचे झाडी लावण्यात आले.

# नागपुरात घरोघरी भगवे ध्वज, रांगोळ्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** अयोध्येत प्रभू रामचंद्रांची प्रतिष्ठानपना होणार असल्याने सोमवारी नागपूरकरही रामाच्या भक्तीत लिन झाले. शहरातील विविध भागांत मंदिर, रस्ते, चौक, अपार्टमेंट, निवासस्थानांवर भगवे ध्वज, तोरण, झेंडे, रस्त्यांवर रांगोळ्या सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते. सर्वत्र मिरवणुकांमध्ये जय श्रीरामाचा गजर एकू येत होता. अयोध्येतील राममंदिरात होणाऱ्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी सोमवारी अवघे नागपूर भगवा झेंडे, तोरण, रांगोळ्या, दिवे, रोषणाईने सजले आहे. शहरातील सर्व मंदिरांची स्वच्छता आणि सुशोभीकरण केले गेले. प्रतिष्ठापना दिनी सकाळपासून शहरात राम भक्तांनी मिरवणूक काढत जय श्रीरामचा गजर केला. सर्वत्र म्युझिक सिस्टम, डिजेवर रामावरील भक्तिगीते वाजत होती. शहरातील प्राचिन पोद्दारेश्वर राम मंदिर, रामनगर राम मंदिरात भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी प्रचंड गर्दी केली. शहरातील अनेक भागात सुंदरकांड, हनुमान चालिसा पठण आदी धार्मिक कार्यक्रम सुरू आहे. टिळक पुतळा येथील राम मंदिर, स्वावलंबी नगर येथील राम मंदिर, रामनगरातील राम मंदिरासह साईमंदिर, टेकडी गणेश मंदिर, स्वामी समर्थ मंदिर, बालाजी मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रम होत आहे. अयोध्येतील प्रतिष्ठापना सोहळा पाहण्यासाठी विविध मंदिरात थेट प्रक्षेपणाची व्यवस्था असून सर्वत्र भाविकांची गर्दी आहे. शहरातील विविध भागातील चौक सजवले असून आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# कवठळ येथे प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त भव्य शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मर्यादापुरुषोत्तम प्रभु श्रीराम जन्मभूमी अयोध्येत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रभु श्रीराम मुर्तीप्राणप्रतीष्ठा सोहळा संपन्न होत असताना या सोहळ्यानिमित्त अयोध्येसह संपूर्ण देशात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या पाश्वभूमीवर कवठळ येथे दि . 22 जानेवारी रोजी युवासेना जिल्हा सरचिटणीस गणेश वाघमारे व पंढरीनाथ पाटील गावंडे यांच्या संकल्पनेतून प्रभु श्रीरामांची बैलगाडा रथातुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या सोहळ्यानिमित्त कवठळ मध्ये घरोघरी रांगोळी काढुन दीपोत्सव साजरा करण्यात आला. बैलगाडा रथाला फुलांनी व केळीच्या खांबांनी सजवून त्यामध्ये प्रभु श्रीराम, लक्ष्मण, सीतामाता व रामभक्त हनुमंताच्या वेशभूषेत लहान मुलांची टाळ मृदंगाच्या गजरात गावातून दिंडी काढण्यात आली, त्यानंतर गावातील दक्षिणमुखी हनुमंताच्या मंदिरात प्रसाद वाटप करून प्रभुश्रीरामाची सामुहिक आरती घेऊन दिंडीची सांगता करण्यात आली. या वेळी पुजारी संतोष महाराज कह्राडे, रमेशबुवा वाघमारे, डिगांबर कह्राडे, दत्ता गावंडे, अंबादास वाघमारे, कचरूबा पडघान, ओम घुबे, यांच्यासह अनेक तरुण, महीला भाविक, व मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते .





# प्रगती बाल विद्या मंदिर इंग्लिश स्कूल लोणीमध्ये हळदी कुंकवाचा कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** प्रगती बाल विद्या मंदिर इंग्लिश स्कूल, लोणी येथे "मकर संक्रांत" निमित्त हळदी- कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाचे उद् घाटन व दिपप्रज्वलन हे ज्येष्ठ महिला आणि बोडखा येथील ग्रा.पं. सदस्या सौ.वैशालीताई शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये बांगडी स्पर्धा, कप टॉवर, उखाणे स्पर्धा, संगीत खुर्ची इ. स्पर्धा घेण्यात आल्या.

या प्रत्येक स्पर्धेमधून प्रथम व द्वितीय क्रमांक काढण्यात आले. त्यामध्ये बांगडी स्पर्धेत 1)अर्चना सोनवणे 2)ज्योती जाधव, कप टॉवर स्पर्धेत- 1)शालिनीबाई निकम 2)शारदा लोंढे, उखाणे स्पर्धेत 1)पूजा पाडसवान 2)विजयाबाई चव्हाण 3)मंगल दांडेकर, संगीत खुर्ची स्पर्धेत 1)मनीषा लोंढे 2) कांचन लोंढे इ. महिलांना आकर्षक बक्षिस देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच प्रत्येक महिलांना वाण देण्यात आले. यावेळी सर्व पालक महिला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा दांडेकर व सहशिक्षिका अनुरूपा सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सोमिनाथ काशिनाथ दांडेकर, सहशिक्षक प्रकाश पल्हाळ, बाळकृष्ण पवार, समरीन पटेल, फरहीन पटेल, रावसाहेब पल्हाळ इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# रायझिंग इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल कडून अयोध्या येथे श्रीराम प्राणप्रतिष्ठा निमित्त गावांतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. आज दिनांक 22-01-2024 रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे अयोध्या श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली त्यामध्ये श्रीराम, लक्ष्मण व सीता यांचे जिवंत देखावे बैलगाडीतून काढण्यात आले. त्याप्रसंगी मान्यवरांनी पुजन केले ,तसेच चिमुकल्यांनी श्रीराम यांच्या गाण्यावर नृत्य सादर केले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक नलावडे सर ,प्राचार्य.योगेश इंगळे सर, सोपान भोपळे, ऋषिकेश वेताळ,संकेत गाडेकर, पुजा नलावडे, सीमा शेळके, मनिषा गायकवाड, आफरीन आत्तार, खुटे मिस, गायकवाड मिस व इतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.






# 'सियावर रामचंद्र की जय' दीपाक्षरांची विश्वविक्रमाला गवसणी

## सुधीर मुनगंटीवार : प्रभूरामाच्या चरणी सेवा अर्पण करून आयुष्य सार्थकी

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** मंगलवेशातील हजारो रामभक्त रामभक्तीने ओतप्रोत वातावरण एका क्षणाला हजारो पणत्या प्रज्वलित व्हायला सुरुवात झाली आणि बघता बघता 'सियावर रामचंद्र की जय' ही दीपाक्षरे अवतरी. हे विहंगम दृष्य साकारले होते चंद्रपूरच्या चांदा क्लब ग्राऊंडवर. ३३ हजार २५८ पणत्यांनी साकारलेला रामनामाचा मंत्र गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डला गवसणी घालणारा ठरला आणि अवघे चंद्रपूर 'राममय' झाले. याची दखल घेत आज (रविवार) गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे मिलींद वेरलेकर आणि प्रसाद कुलकर्णी यांनी ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांना प्रमाणपत्र प्रदान केले तेव्हा टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूर शहरातील डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालय समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपा महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, देवराव भोंगळे, डॉ श्यामा प्रसाद मुखर्जी वाचनालय अध्यक्ष राजेश्वर सुरावार, डॉ. तन्मय बीडवाई, पवन गादेवार, मिलिंद वेरलेकर, प्रसाद कुलकर्णी, पवन गादेवार, मधुसूदन रुंगठा, शैलेंद्र शुक्ला, अशोक संगिडवार, डॉ. गुलवाडे, प्रमोद कडू, राखी कंचर्लावार, रोडमल गहलोत, शैलेश बागला, मधुसूदन रूंगठा, चमकोरसिंह बसेरा, मीना देशकर, गिरिश मारलीवार, अन्नाजी ढवस, विनोद तिवारी, प्रभाकर खड्के, कुशन नागोसे, स्मिता रेवनकर, चंदाताई इटनकार, दामोदर सारडा, राजीव गोलीवार आदींची उपस्थिती होती. दीपोत्सवाचे जगभरातील लाखो रामभक्त साक्षीदार ठरले. पहिली रामज्योत प्रज्वलित करण्याचा मान वाल्मिकी समाजाच्या शशी लखन, दुसरी ज्योत प्रज्वलित करण्याचा मान केवट भोई समाजाच्या आशा दाते, तिसरी ज्योत प्रज्वलित करण्याचा मान मुस्लिम समाजाच्या चांद पाशा सय्यद, चौथी ज्योत प्रज्वलित करण्याचा मान अनुसूचित जातीच्या प्रियंका थुल, पाचवी ज्योत प्रज्वलित करण्याचा मान आदिवासी समाजाच्या गीता गेडाम तर सहावी रामज्योत प्रज्वलित करण्याचा मान शीख समाजाच्या वतीने बलजीत कौर बसरा यांना मिळाला. तसेच सौ. सपना मुनगंटीवार, शलाका बिडवई यांनीही ज्योत पेटवली. त्यानंतर राम सेविकांमार्फत संपूर्ण ज्योती पेटविण्यात आल्या. हा नयनरम्य सोहळा साजरा होत असताना ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूरकरांचे कौतुक केले. 'अयोध्येच्या प्रभू श्रीराम मंदिरासाठी 29 मार्च 2023 रोजी चंद्रपूर-गडचिरोलीच्या दंडकारण्यातून अतिशय पवित्र भावनेने सागवान काष्ठ पाठविण्यात आले. त्या काष्ठापासून प्रभू राम मंदिराच्या गर्भगृहाच्या महाद्वाराचे अतिशय सुंदर नक्षीकाम करण्यात आले आहे. प्रभू श्रीरामाच्या नावामध्ये चंद्रपूरचा चंद्र देखील आहे. प्रभू राम देशाच्या आस्थेचा विषय आहे. त्यामुळे विश्वविक्रमी रामज्योत प्रज्वलित करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही रामज्योत सेवेची व भक्तीची आहे,' अशा उत्स्फूर्त भावना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

'सियावर रामचंद्र की जय' या ११ अक्षरी मंत्राच्या दीपप्रज्वलनाचे फोटो व व्हिडिओ गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या लंडन कार्यालयाला तसेच १८० देशांमध्ये पाठविले जाणार आहेत, अशी माहिती गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे श्री. मिलिंद वेरलेकर यांनी दिली.

रामभक्तीचा विश्वविक्रम केल्यामुळे जगात चंद्रपूरचा गौरव वाढला आहे. आज झालेल्या ऑनलाईन बैठकीत देशभरातील केंद्राचे प्रतिनिधी, महामंत्री, राज्याचे अध्यक्ष, प्रमुख, २१ खासदारांच्या बैठकीत सर्वांत पहिले एकमताने चंद्रपूरच्या अभिनंदनचा प्रस्ताव मांडण्यात आला, अशी माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक होण्यापूर्वी प्रतापगडच्या भवानी मातेच्या मंदिरात छत्रपती शिवाजी महाराज गेले होते. तिथे त्यांनी एक रत्नजडीत छत्र भवानी मातेला चढवले. नंतर त्याची लूट झाली. पण पुन्हा चांदीचे छत्र बसविण्याचे भाग्य आपल्याला लाभले. महाराजांच्या राज्याभिषेकाची शोभायात्रा निघते तेव्हा पालखीही निघते. ही पालखी सुद्धा जीर्ण झाली होती. ती आपण चंद्रपूरच्या वतीने साठ किलो चांदीची पालखी दिली. पुढील दोनशे वर्षे राज्याभिषेकाची शोभायात्रा त्याच पालखीतूनच निघणार आहे याचा अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या श्रीशैलममध्ये तपश्चर्या केली, तिथे महाराजांचे एक छोटे मंदिर होते. सरकारने तिथे भव्यदिव्य मंदिर उभे केले. २९ जुलै १९५३ नंतर पहिल्यांदा अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण सरकारने हटवले. महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे सरकार ब्रिटनवरून भारतात येणार आहेत. जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे 'आम्ही पुणेकर' या संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाकिस्तानच्या दिशेने तलवार पकडलेल्या पुतळ्याचे देखील काही दिवसांपूर्वी अनावरण झाले. आता शत्रूची वाकडी नजर भारतावर पडणार नाही, याचाही मुनगंटीवार यांनी आवर्जून उल्लेख केला.

# चिमुकल्यांनी गिरवले आर्थिक व्यवहारांचे धडे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षणा सोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना शालेय व व्यावहारीक ज्ञान प्राप्त होवून त्यांचे व्यक्तिमत्व उन्नत होत आहे. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत आर्थिक व्यवहाराचे ज्ञान होण्यासाठी जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा हिवरा आश्रम येथे शनिवार ता.२० रोजी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी २० ते २५ खाद्य पदार्थ बनवून त्यांची स्वतः विक्री करून आर्थिक व्यवहाराचे धडे गिरविले. जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा हिवरा आश्रमच्या या चिमुकल्यांची सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. या बाल आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांना विक्री कौशल्या सोबतच आर्थिक व्यवहार कसा करावा याचे ज्ञान प्राप्त झाले. या आनंद मेळाव्यात १३० विद्यार्थी विद्यार्थीनींचा उस्फुर्तपणे सहभाग घेतला. शाळेतील विद्यार्थ्यांनी सकाळी ८ ते १० वेळात शाळेच्या प्रांगणामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या खाद्य पदार्थाची स्टॉल लावले होते. या आनंद मेळाव्यात खाद्य पदार्थाचे प्रदर्शन व विक्री साठी मांडण्यात आले होते. यामध्ये कचोरी, समोसा, वडापाव, भजे, गुलाब जामुन, जिलेबी, पाणी पुरी, भेळ, इडली, डोसा, ढोकळा, वडे, पॉपकॉर्न, पोंगे, विविध फळे,व यासारखे अनेक पदार्थ होते. यावेळी शाळा समिती अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सदस्य, बहुतांश पालक महिला वर्ग यांनी सहभाग झाले होते. यावेळी पालकांनी सहभाग घेऊन मुलांचा आनंद द्विगुणित केला. बाल आनंद मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहित केले. यावेळी केंद्र प्रमुख शिवाजीराव लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली बाल आनंद मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक ए. पी. शेळके, शिक्षक पी. बी. दुनगू, एस. यू .पवार, एस. एच. पुरी, कु एम. एस. म्हस्के, कु एस. पी. तुपकर, कु. ए. एस. साखरे ,कु आर. एस. सजगुरे यांनी अथक परिश्रम घेतले.





# अविष्कार भुसे यांच्या उपस्थितीत बाईक रॅली

## चेतन मंडोरे यांच्या संयोजनाने शेकडो राम भक्त उपस्थित

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** संपूर्ण जगात लक्ष वेधणारे आयोध्या चे प्रभू श्री राम मंदिर येथे राम लल्लाची मूर्ती विराजमानन होणार त्यानिमित्ताने नाशिक व धुळे जिल्ह्याला अविष्कार भुसे यांनी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या ठिकाणी भारतीय जनता पार्टीचे चेतन मंडोरे यांनी खासदारांच्या उपस्थितीत गिंडोळ्या कंपाउंड ते संपूर्ण आग्रा रोड मोठी जल्लोषात रॅली काढण्यात आली त्यासाठी अनुप अग्रवाल यांनी सम्पुर्न अयोजक यांचे अभिनंदन करण्यात आले संपूर्ण धुळे शहर राममय झाले आहे ज्याप्रमाणे अयोध्येत राम मंदिर सजणार आहे त्याचप्रमाणे धूळ्यात तशाच मंदिराची प्रतिकृती साकारली आहे त्या ठिकाणी सर्व धुळेकर जनतेने उपस्थित राहायचे आहे कारण त्या ठिकाणी अयोध्या राम मंदिरासारखे दर्शन मिळणार आहे असे या ठिकाणी माजी जिल्हाध्यक्ष अनुपजी अग्रवाल यांनी सांगितले.


# भारतीय जनता पार्टीच्या सिंदखेडराजा तालुका उपाध्यक्षपदी विठ्ठल राठोड यांची नियुक्ती !

आधुनिक केसरी न्यूज



**सिंदखेडराजा :** तालुक्यातील जनुना तांडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले विठ्ठल राठोड यांची भारतीय जनता पार्टी तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सिंदखेडराजा तालुका कार्यकारणी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने त्याचबरोबर जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांन्टे, माजी आमदार चैनसुख संचेती, आ. आकाश फुंडकर, आ. श्वेताताई महाले, आ .विजय शिंदे, तुकारामी कायंदे, भाजपा प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ विधानसभा संपर्कप्रमुख प्रा . गजानन घुले जिल्हा महामंत्री यांच्या संमतीने सदर विठ्ठल राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीमुळे भाजपा नवनियुक्त तालुका उपाध्यक्ष विठ्ठल राठोड यांनी आपण तळागाळातील कार्यकर्त्यांना भाजपासोबत आणण्याचा पुरेपूर प्रयत्न करत असून दिलेले पद हे वाया जाऊ देणार नाही शेतकरी कष्टकरी यांच्या न्याय हक्कासाठी आपण लढा उभारू असे सुद्धा नवनियुक्त तालुका उपाध्यक्ष विठ्ठल राठोड यांनी सांगितले आहे,त्यांच्या निवडीमुळे परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# जीर्णावस्थेत असलेल्या शाळांचे प्रस्ताव सादर करा

## आ. जोरगेवार : विविध विषयांवर घेऊन जिल्हा परिषद येथे आढावा बैठकीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** ग्रामीण भागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी आमचे प्रयत्न सुरु आहे. शिक्षण, आरोग्य आणि मुलभुत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आरोग्याबाबत येथील नाररिकांनी काळजी घ्यावी, जिल्हा परिषदेनेही याबाबत जनजागृती करावी. तसेच या भागातील जिर्ण अवस्थेत असलेल्या शाळांचे बांधकाम करण्यासाठी अशा शाळा निर्लेखीत करुन महिण्याभरात प्रस्ताव सादर करा अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांना दिल्या आहे.

मतदार संघातील विविध विषयांना घेउन आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा परिषद येथे बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना सांळुखे, नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मधूकर वासनिक, जिल्हा आरोग्य अधिकारी अशोक कटारे, प्राथमीक शिक्षण अधिकारी राजकुमार हिवारे, कार्यकारी अभियंता नुतन सावंत, यंग चांदा ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, वढाचे संरपंच किशोर वरारकर, सोनगेगाव सरपंच संजय उकीनकर, धानोरा विजय आगरे, कोसारा सरपंचा ऋतिका नरुले, मोरवा सरपंचा स्नेहा साव, पांढरकवडा सरपंच सुरज तोतडे, उसगाव सरपंच निवेदीता ठाकरे, म्हातारदेवी सरपंचा सध्या पाटील, बेलसनी सरपंचा इंदिरा पोले, छोटा नागपूर सरपंचा चित्रा गणफाडे, ताडाळी सरपंच संगीता पारखी, साखरवाही सरपंच नागेश बोंडे, दाताळा सरपंच सुनिता देशकर, वेंडली सरपंचा अलवलवार, पिपरी सरपंचा मातने, मारडा सरपंच गणपत चैधरी, छोटा नागपूर उपसरपंच ऋषभ दुपारे, यंग चांदा ब्रिगेडचे अशोक पारखी, धनंजय ठाकरे, मुन्ना जोगी, अनिल नरुले, रुपेश झाडे, भोला अतकारी, गुड्डू सिंग, भाग्यवाण गणफुले, अजय गौरकार, करण नायर आदींची उपस्थिती होती. मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेवर ग्रामीण भागाच्या विकासाची मोठी जबाबदारी आहे.

आपण या भागात काम करत असतांना नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजे. अवकाळी पावासामुळे झालेल्या नुकसाणीचे तात्काळ पंचणामे करा, प्रत्येक गावात पशु, गुरे यांची नियमीत वैद्यकीय तपासणी करण्यात यावी, २०१६ पासूनचे वृद्ध कलावंत मानधन योजना वृद्धांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत त्यावर काय कार्यवाही करण्यात यावी, २०२१ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील गावातील लोकसंख्येच्या अनुषंगाने प्रत्येक गावात संविधान सभागृह बांधणे करिता प्रस्ताव मागविण्यात आले होते त्या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा, दिव्यांग यांना जिल्हा परिषद दिव्यांग विभागाच्या वतीने शासनाच्या योजनांची माहिती देण्याकरीता विशेष योजना राबविण्यात यावी, चिंचाळा, नागाळा, सिदूर, वेंडली, धानोरा, पिपरी, शेणगाव या सात गावातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा, ग्रामीण भागात रोजगार स्वयंमरोजगार निर्मितीकरिता जिल्हा परिषद अंतर्गत अभियान राबविण्यात यावे, जिल्हा परिषद अंतर्गत राबविल्या जात असलेल्या विविध शासकीय योजना प्रत्येकाच्या दारी पोहचण्याकरिता यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी, शासकीय योजनांच्या लाभासाठी एक खिडकी उपक्रम राबविण्यात यावा, यासह अनेक सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी या बैठकीत अधिका-यांना केल्या आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# डॉ. नानाभाऊ यांच्याकडून पत्रकारांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** पत्रकार दिनाचे औचित्य साधत जळगाव जामोद तालुक्यातील पत्रकार बांधवांचा 20 जानेवारी रोजी जळगाव जामोद येथे डॉक्टर नानाभाऊ यांचे कडून सत्कार करण्यात आला. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.त्यानंतच सर्व पत्रकार बांधवांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ.नानाभाऊ अतीशय प्रेमळ व्यक्तिमत्त्व असून त्यांनी बरीच वर्षे गोरगरीब जनतेची सेवा केलेली आहे.

पत्रकार हा समाजाचा असतो.समाजातील प्रतिबिंब लेखणीच्या पत्रकार सातत्याने मांडत असतो.त्यासाठी त्यांचाही कुठे तरी सत्कार केला पाहिजे या भावनेतून डॉ.नानाभाऊ यांनी आज इलेक्ट्रॉनिक व प्रींट माध्यमात काम करणाऱ्या पत्रकार बांधवांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यानंतर सर्वांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष गुलाबराव इंगळे,शमीम देशमुख यांचेसह तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव हजर होते.

# मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्या करता आजपासून सर्वेक्षण सुरू

## कुटुंबप्रमुखांनी घरी थांबून प्रशासनास सहकार्य करावे

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** राज्य शासनाने मराठा समाज व फुले प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण करण्याकरता पर्यवेक्षक प्रगणक यांच्यामार्फत मराठा समाजाचे मागासले पण तपासण्याबाबतच्या आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार आयोगामार्फत शहरी व ग्रामीण भागातील मराठा समाज तसेच खुल्या प्रवर्गातील जातीचे सर्वेक्षण करून माहिती गोळा करण्याचे काम सुरू करण्यात येत असून सर्वेक्षणाचे काम दिनांक 23 जानेवारी ते 31 जानेवारी पर्यंत पूर्ण करायचे असून त्यासाठी प्रत्येक गावात दीडशे ते दोनशे कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यासाठी एक प्रगणक नेमण्यात आली आहे त्या अनुषंगाने सिनखेडराजा तालुक्यातील सर्व नागरिकांना तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी आवाहन केले आहे की सर्वेक्षण दरम्यान कुटुंबप्रमुखांनी घरी थांबून आपल्या कुटुंबाची माहिती प्रगणक यांनी विचारले असता त्यांनी विचारलेली सविस्तर माहिती त्यांना देण्यात यावी व प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार सचिन जयस्वाल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे,



# उपेक्षित, वंचितांना सक्षम करण्यासाठी लक्ष्यवेधचा लढा निरंतर सुरू राहील

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** दि.२० महिलांसाठी, महिला बचत गटांसाठी आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी शासनाच्या विविध योजना आहेत ,परंतु प्रत्येक जण त्या योजनेपर्यंत पोहोचू शकत नाही ही खंत आहे. शासकीय तंत्र सहाय, शासनाचे अनुदान आणि आर्थिक पाठबळ याशिवाय कोणी स्वयंरोजगार किंवा लघुउद्योग उभारू शकत नाही. या सर्व बाबीची जाण ठेवून ह्या परिसरातील गरजवंत, वंचित ,उपेक्षित युवक, युवती यांना स्वयंरोजगार मिळावा. ते लघु उद्योजक व्हावे, ते आपल्या पायावर उभे राहावे. ह्या सर्वांना सक्षम करण्यासाठी लक्षवेध या सामाजिक संघटनेचा लढा निरंतर सुरू राहील, असे प्रतिपादन लक्षवेधच्या अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव नंदाताई पाऊलझगडे यांनी केले. त्या दिनांक १९ जानेवारी रोजी लक्षवेधच्या स्थानिक सभागृहात महिला युवक युवतींना मार्गदर्शन आणि पत्रकारांचा गौरव कार्यक्रमात बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष गुलाबराव इंगळे तर



जयदेव वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ह्या तालुक्यात आदिवासी दुर्बल घटक मोठ्या प्रमाणात आहे. तसेच महिला बचत गट व बेरोजगार युवक युवतींसाठी लक्षवेध चा लढा हा गौरवास्पद आहे असे मत यावेळी पत्रकार गुलाबराव इंगळे यांनी व्यक्त केले. लक्षवेध संघटना ही युवा युवती आणि सर्व स्तरातील उपेक्षित बेरोजगारांसाठी कार्य करत आहे त्यामुळे तालुक्यातील पत्रकार मंडळी संघटनेच्या पाठीशी उभे राहतील अशी ग्वाही पत्रकार राजू वाडे यांनी यावेळी दिली संघटनेची भूमिका स्पष्ट करून कार्यक्रमाचे संचलन पत्रकार सागर झनके यांनी केले संघटनेचे संग्रामपूर तालुकाध्यक्ष प्रकाश फाटे यांनी नंदाताई पाऊल झगडे यांच्या माध्यमातून शेगाव, संग्रामपूर, जळगाव जामोद या तिन्ही तालुक्यात मोठ्या प्रमाणात कार्य होत आहे असे सांगितले. त्यांनी संघटनेची भूमिका आणि उद्दिष्टे विशद केली. या कार्यक्रमासाठी लक्षवेध चे पदाधिकारी तसेच पत्रकार सागर झनके, विनोद वानखडे, राजेश बाठे, अनिल भगत, आकाश उमाळे, गणेश भड, संजय दांडगे, गोपाळराव अवचार, शमीम बापू देशमुख, योगेश म्हसाळ, गजानन सोनटक्के, नागेश भटकर यांची यांचा ह्या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश पाऊल झगडे प्रकाश फाटे प्रवीण ठाकरे यांचे सह संघटनेच्या पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# आरंभमध्ये विशेष मुलांसाठी डिजिटल एज्युकेशन

## सीएसआरच्या माध्यमातून शाळेचे डिजिटलायझेशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एबीसीडीपासून ते दैनंदिन कामे(एडीएल), व्यवहार ज्ञानापासून ते व्यवसाय प्रशिक्षण, गाणी, कविता आणि व्यायामाचे धडे डिजीटलवर बोर्डवर गिरवणारी स्वमग्न आणि गतीमंद मुले हे चित्र मागील दोन आठवड्यापासून आरंभ स्वमग्न व गतीमंद मुलांच्या शाळेत दिसत आहे. दृकश्राव्य माधमातून शिकताना मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि अल्पावधीतच त्यांच्या आकलन शक्तीत झालेले बदल स्पष्टपणे दिसून येत आहेत. स्वमग्न तसेच गतीमंद मुलांना डिजीटल एज्युकेशनच्या माध्यमातून थेरीपी आणि शिक्षण देणारी मराठवाड्यातील पहिली शाळा म्हणून आरंभची नोंद झाली आहे. आरंभ मध्ये विशेष मुलांसाठीच्या शिक्षण पध्दतीच्या डिजीटायलेझशचे उदघाटन डॉ. नरेंद्र वैद्य आणि महापालिकेचे उपायुक्त सौरभ जोशी तसेच एचडीएफसी बँकेचे टेरीटेरी मॅनेजर पुरुषोत्तम



बोरसे यांच्या प्रमुख उपस्थित झाले. गिव्ह इंडीयाच्या माध्यमातून एचडीएफसी बॅंकेच्या सामाजिक दायित्व निधीतून आरंभ शाळेत डिजीटल एज्युकशेनला सुरुवात झाली. प्रत्येक वर्गात इंटरॅक्टिव्ह पॅनल, मुलांना टॅब, युपीएसची व्यवस्था आणि नवे स्कूल फर्निचरने आरंभ शाळा सजली आहे. विशेष मुलांचा अभ्यासक्रम त्यांचे वय आणि आकलन पातळीनुसार सॉफ्टवेअरमाध्यमातून टॅब आणि पॅनलमध्ये घेण्यात आला आहे. प्रत्येक मुलनिहाय आणि विषय निहाय सुक्ष्मनियोजन करुन अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. याचे शिक्षकांना खास प्रशिक्षण देण्यात आले आहे. उदघाटन कार्यकम प्रसंगी बोलताना महापालिकेचे उपायुक्त सौरभ जोशी यांनी आरंभने स्वमग्नतेसंबंधी जनजागृतीचे जास्तीत जास्त कार्यकम घ्यावेत असे आवाहन केले. एचडीएफसी बँकेचे टेरीटेरी मॅनेजर पुरुषोत्तम बोरसे यांनी आरंभच्या भविष्यातील प्रकल्पांना सर्वोतपरी मदत करेल असे सांगितले. आरंभच्या संस्थापक ,संचालिका अंबिका टाकळकर यांनी आरंभ संस्थेचा आत्तार्यतचा प्रवास आणि भविष्यातील प्रकल्पांची माहिती प्रास्ताविकात दिली. आरंभचे सीएसआर कोऑर्डीनेटर आनंद पोळ यांनी डिजीटायलेशन प्रकल्पाविषयी माहिती दिली. आरंभच्या विश्वस्त वैशाली सुतावणे यांनी संचलन केले. यावेळी आरंभच्या पालकांसह विश्वस्त चेतन पाटील, मिलीद दामोदरे, सल्लागार समितीचे रविंद्र करवंदे, सौरभ दरख, एनआरबी कंपनीचे प्रतिनिधी, अक्षय अग्रवाल, राहूल देशपांडेए डॉ.मुक्ता कुलकर्णी यांची उपस्थिती होती. विजयश्री जाईबहार, अश्विनी वांढेकर, गोपाळ देशमुख, निलीमा वावरे या शिक्षकांसह शोएब शेख, किरण जोशी, सिध्देश रेवणकर, रउफ शेख, चंद्रकला मिसाळ, सोनल पवाळ यांनी कार्यकम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

**स्विकार महत्वाचा- डॉ. नरेंद्र वैद्य**

एकाच झाडावर अनेक फळे लागतात. त्यातील एखादे अपरिपक्व राहते म्हणून झाड त्या फळाला नाकारत नाही. विशेष मुलाचेही तसेच आहे. आपले मुल विशेष आहे हे जेवढे लवकर स्विकारले जाईल तेवढे त्याच्या पालकांना त्याचे भविष्य घडवणे सोपे जाईल. फळ अपरिपक्व आहे म्हणून त्याला बाजूला काढू नका ते कसे पिकेल यासाठी प्रयत्न करा असे आवाहन ज्येष्ठ फिजीशियन आणि सामाजिक क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाणारे डॉ. नरेंद्र वैद्य यांनी केले. खापराची पाटी ते डिजीटल एज्युकशेन हा बदल झपाट्याने बौध्दिक उत्कांती करणाऱ्या माणसाठी अतिशय गरजेचा असल्याचेही ते यावेळी म्हणाले.



# मिरेवाडी येथे शिक्षण परिषद उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था फलटण यांच्या माध्यमातून मिरेवाडी (कुसुर) ता.फलटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाडेगाव फार्म केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद शुक्रवार दिनांक १९जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली होती.गटशिक्षणाधिकारी अनिल संकपाळ व केंद्रप्रमुख बन्याबा पारसे यांच्या मार्गदर्शनाखाली ही शिक्षण परिषद संपन्न होत असताना यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सरपंच राजाराम सोनवणे,माजी सैनिक शंकरराव नरुटे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष युवराज नरुटे,ज्येष्ठ ग्रामस्थ त्रिंबक नरुटे,सुहास मोहिते ग्रामसेवक चव्हाण आदी उपस्थित होते.अगदी उत्साहपूर्ण वातावरणात ही परिषद घेण्यात आली. शिक्षण या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.तसेच शिक्षकवृंद यांनी परीषदेत विचार मंथन करत संवाद साधला. शिक्षण परिषदेची सुरवातच राष्ट्रगीत, प्रतिज्ञा,संविधान आणि राज्यगीताने करण्यात आल्याने एक राष्ट्रभावना दिसुन आली.कार्यक्रम प्रसंगी उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत प्रतिभा कुमठेकर यांच्या हस्ते करण्यात आले. परिषदेच्या सुरुवातीलाच केंद्र संचालक मनोज चव्हाण यांनी उपस्थितीचा आढावा घेतला.गणेश विरकर यांनी "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान "या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.शारदा अडसूळ व अनिल भंडलकर यांनी इयत्ता निहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती नुसार लेखन वाचन व गणिताचे मूलभूत संबोध या संदर्भात विश्लेषण व कृती कार्यक्रम याविषयी मार्गदर्शन केले.केंद्रांतर्गत शाळांवर राबवित असलेले उल्लेखनीय उपक्रमांचे सादरीकरण प्रत्येक शाळेतील एका शिक्षकाने केले.केंद्र स्तरावरील व केंद्रप्रमुखांनी निर्धारित केलेले विषय व प्रशासकीय विषय याविषयी मनोज चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी प्रभारी मुख्याध्यापक किशोर चांदगुडे यांनी काम पाहिले तर उपस्थितांचे आभार पांडुरंग खताळ यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावातून वनिता सोनवणे,सीमा धायगुडे,वैष्णवी चोरमले यांचे सहकार्य लाभले.

# डॉ. शिंगणे यांच्या उपस्थितीत सत्यशोधक हाऊसफुल; शोपूर्वी आकाशात आतषबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित सत्यशोधक हा ऐतिहासिक चित्रपट माजी मंत्री तथा मातृतीर्थ मतदार संघाचे आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांच्या उपस्थितीत हाउसफुल झाला. दरम्यान शो सुरू होण्यापूर्वी आकाशात उधळलेल्या आतषबाजीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसून आला. तर सत्यशोधकीय चित्रपट सुरुवातीपासून अखेर पर्यंत बघताना श्रोते मात्र मंत्रमुग्ध झाले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीचा शोध घेणारे सत्यशोधक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित सुनील शेळके दिग्दर्शित सत्यशोधक चित्रपट पाहण्याचा मोह माजी मंत्री तथा आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनाही आवरता आलं नाही. स्थानिक संतोष चित्रमंदिर येथे प्रदर्शित झालेल्या सत्यशोधक चित्रपट पाहण्यासाठी डॉ राजेंद्र शिंगणे आपल्या कार्यकर्त्यांसह पोचले त्यावेळी राष्ट्रवादी नेते गणेश सवडे,पालिकेच्या तत्कालीन राष्ट्रवादी गटनेत्या सुनिताताई सवडे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ शिंगणे यांचे स्वागत केले. याप्रसंगी कार्यकर्त्यांनी आकाशी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला. लग्नानंतर आ.डॉ राजेंद्र शिंगणे यांनी सुरुवातीपासून अखेरपर्यंत सत्यशोधक सिनेमा बघितला. समाजात जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवन कार्य स्फूर्ती देणारे असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी नगराध्यक्ष संतोष खांडेभराड, कवीश जिंतूरकर,सरस्वती टेकाळे,बाजार समितीचे सभापतीसमाधान शिंगणे, माजी सभापती रंगनाथ कोल्हे,गजानन पवार, नितीन शिंगणे, ज्येष्ठ नेते गंगाधर जाधव, तालुकाध्यक्ष प्रा.उद्धव म्हस्के,कार्यक्रमाचे संयोजक भूपाल डोणगावकर व अरविंद खांडेभराड, राष्ट्रवादी नेते हाजी आलम कोटकर,गणेश बुरकूल,संतोष बुरकूल,रेणुका बुरकूल,मंदा शिंगणे,रेखा पवार,बाबा खान,प्रदीप वाघ,सै.करीम, शेजुळकर, काशीफ कोटकर,जफर सिद्दीकी,सरपंच दत्तात्रय कोल्हे, अमीर पैलवान,बाबासाहेब कासारे, बबन कासारे,पंकज बैरागी,रामू खांडेभराड आदी उपस्थित होते.





# दारूबंदीसाठी सिनगाव जहाँगीरकरांचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** अवैध देशी दारू विक्रीची दुकाने बंद करून गावात दारूबंदी करा या मागणीसाठी तालुक्यातील सिनगाव जहागीर येथील ग्रामस्थांनी ठाणेदार यांना निवेदन दिले.

गावात अवैध देशी दारू विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यापूर्वीही शिनगाव जहागीर येथील ग्रामस्थांनी दारूबंदीची मागणी केली होती. निवेदन देताना अक्षय डोईफोडे, वैभव उबाळे, योगेश मिसाळ, सुनील काकड, किरण बोरुडे, ॲड.राजू मांटे, शुभम मांदळे, सचिन डोईफोडे, देवा सानप, समाधान सानप, शरद बंगाळे,जितेंद्र म्हस्के, पवन भालेराव,गजानन बंगाळे, शैलेश मोरे, निलेश शिवणकर, अमोल मानटे,शँकर जयभाये, इरफान सय्यद, विकास खरात, निखिल खरात, लखन डोईफोडे, मंगेश होलगरे, परमेश्वर सोळंके, योगेश म्हस्के, आकाश काटकर, वैभव घुगे, चैतन मंडलिक, संकेत उबाळे आदी उपस्थित होते.


गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in